१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक


# नवाकाळ

• पुणे, सोमवार २५ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३३८, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 338, Marathi - Daily - Pune, 25 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## श्री गणेश स्थापनेचा मुहूर्त



**मुंबई-** श्री गणेश चतुर्थीचा सण यावर्षी बुधवार २७ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणार आहे. पंचांगकर्ते दा. कृ. सोमण यांनी सांगितले की, गणेशमूर्ती स्थापनेसाठी मध्यान्हकाल सकाळी ११.२५ ते दुपारी १.५४ पर्यंतचा वेळ शुभ आहे. ज्यांना या वेळेत प्रतिष्ठा करता येणार नसेल त्यांनी सूर्योदयापासून दुपारी १.५४ वाजेपर्यंत मूर्ती स्थापना आणि पूजन करावे. यावर्षी गौरी आगमन रविवारी, ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.२५ वाजेपर्यंत अनुराधा नक्षत्रात करावे. गौरी पूजन सोमवार १ सप्टेंबर रोजी तर गौरी विसर्जन मंगळवार, २ सप्टेंबर रोजी रात्री ९.५० पर्यंत मूळ नक्षत्रात करावे. २०२६ मध्ये अधिकमास येत असल्याने पुढील वर्षी गणेश चतुर्थीचे आगमन १८ दिवस उशिराने सोमवार १४ सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे.

# राज ठाकरेंकडून गणपतीचे निमंत्रण

## उद्धव ठाकरे पहिल्यांदाच शिवतीर्थावर जाणार

**हिंदी सक्तीच्या मुद्यावरून प्रथमच एका मंचावर आल्यावर उद्धव आणि राज हे ठाकरे बंधू आता ठाकरे ब्रँड बनून पालिका निवडणुकीत उतरण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही ठाकरे बंधू अधिकृत युतीबद्दल अजून काहीच बोलत नसले तरी आपण एकत्र आल्याचे ते वेगवेगळ्या घटनांतून आवर्जून दाखवत आहेत. आता राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना गणेशोत्सवासाठी आपल्या घरी येण्याचे प्रथमच निमंत्रण दिले आहे. हे निमंत्रण उद्धव ठाकरे स्वीकारतील हे उघड आहे. हा कौटुंबिक सोहळा पाहण्यास सर्वच उत्सुक आहेत.**

■ मुंबई

**राज** ठाकरे यांच्या घरी दीड दिवसांचा गणपती येतो. गणेशोत्सवाच्या निमित्ताने राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी अनेक नेते येत असतात. यात आजवर भाजपा नेत्यांची संख्या अधिक होती. नितीन गडकरी, फडणवीस, एकनाथ शिंदे, आशिष शेलार, नारायण राणे, उदय सामंत अशा अनेकांनी त्यांची घरी भेट घेतली आहे. मात्र राज ठाकरे यांनी शिवसेना सोडल्यानंतर



उद्धव ठाकरे कधीही त्यांच्या घरी गेलेले नाहीत. यंदा राज ठाकरे यांनी त्यांना फोन करून गणेशोत्सवासाठी सहकुटुंब आपल्या घरी शिवतीर्थावर येण्याचे निमंत्रण दिले आहे. या निमंत्रणाचा मान राखून उद्धव ठाकरे, पत्नी रश्मी आणि पुत्र आदित्य-तेजस हेही शिवतीर्थावर जातील असे संकेत आहेत. काही दिवसांपूर्वीच राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. जवळजवळ २० वर्षांनी ते मातोश्रीवर गेले होते. तेव्हा त्यांनी उद्धव यांच्याशी संवाद साधला होता. बाळासाहेब ठाकरे यांच्या खोलीतही ते गेले होते. यावर्षीच्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने ठाकरे कुटुंब एकत्र येणार असल्याने दोन्ही पक्षांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कालच मनसे नेते अमित ठाकरे यांना याबाबत विचारले असता त्यांनी, तुम्हाला सरप्राईज मिळेल असे उत्तर दिले होते. आज हे सरप्राईज उघड झाले.

दरम्यान, उद्धव आणि राज ठाकरे या दोघांनी आज मतचोरी या विषयावर एकमत जाहीर केले. दोघांनी मतचोरीबाबत सतर्क राहा, असे कार्यकर्त्यांना सांगत भाजपावर निशाणा साधला. आज पुण्यात झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत राज ठाकरे म्हणाले की, मी लोकांना लोकसभेवर बहिष्कार टाकण्याबाबत सांगत होतो. ती जागतिक बातमी झाली असती. राहुल गांधींनी मतचोरी प्रकरण उघड केले आहे. मी यापूर्वीच सांगत होतो की, आपल्याकडे मतदान व्यवस्थित होत नाही. मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गडबड सुरू आहे. आपली मते चोरली जात आहेत. त्यामुळे आपल्याला सतत पराभवाला सामोरे जावे लागत आहे. यावर गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. याची सखोल चौकशी झाली, तर मागील १० ते १२ वर्षांतील अनेक बाबी उघड होतील. त्यामुळे या मतचोरीची चौकशी झाली पाहिजे. माझ्या हातात प्रत्येकाची यादी आली पाहिजे, ती नीट तपासली आहे हे मला जाणवले पाहिजे, जर यादी आली नाही तर मी निवडणूक लढवणार नाही. मतदार यादीच्या कामावर लक्ष केंद्रित करा.

दुसरीकडे उद्धव ठाकरे यांनी दहिसर येथे शिवसेना शाखांना भेट दिली. त्यावेळी ते म्हणाले की, प्रत्येक गटप्रमुख आणि प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या वॉर्डात पान ७ वर

### महाराष्ट्रात मतचोरी केली बिहारमध्ये होऊ देणार नाही

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरीच्या मुद्यावरून बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मतदार हक्क यात्रा काढली आहे. यात्रेच्या आठव्या दिवशी आज राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले की, निवडणूक आयोग, निवडणूक आयुक्त आणि भाजपा यांच्यात भागिदारी आहे. एसआयआर हा मतचोरीचा संस्थात्मक प्रयत्न आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि हरियाणात मतचोरी झाली, पण आम्ही बिहारमध्ये मतचोरी होऊ देणार नाही. प्रत्येक पक्ष मतदार पडताळणीमध्ये धोका असल्याचा आरोप करत आहे. पण भाजपा गप्प आहे. म्हणूनच मी म्हटले की, त्यांची भागिदारी आहे.



चिराबाजारचा गणपती

## कबुतरांचा माणसाला धोका नाही

### पेटाचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ मुंबई

**कबुतरांमुळे** मानवी आरोग्याला कोणताही धोका नसल्याचा दावा प्राणी हक्कांसाठी काम करणाऱ्या पीपल फॉर द एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल्स अर्थात पेटा संघटनेने केला आहे. कबुतरांना सार्वजनिक ठिकाणी अन्न देणे ही मानवी परंपरा असल्याचेही संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. पेटाचे म्हणणे आहे की, वातानुकूलित प्रदीर्घ काळ राहिल्याने मानवाला श्वसनाचे आजार होत आहेत. हे आजार कबुतरांमुळे झालेले नाहीत.

पेटाने मुख्यमंत्र्यांना कबूतर संवर्धनाचा तीन कलमी आराखडा दिला आहे. कबुतरांमुळे मानवी आरोग्याला धोका असल्याचे दावे फेटाळून लावण्यासाठी



पेटातर्फे वेगवेगळे दाखलेही देण्यात आले आहे. पेटाच्या तीन कलमी आराखड्यानुसार, कबुतरखान्यांमध्ये विशिष्ट अन्न देण्याची ठिकाणे आणि वेळ निश्चित करा, महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांकडून नियमित स्वच्छता करा आणि नागरिकांमध्ये पान ७ वर

## लाडकी बहीण बंद करू का?

### अजित पवारांनी उत्तर टाळले

■ मुंबई

**लाडकी** बहीण योजनेत मोठ्या प्रमाणावर बोगस लाभार्थ्यांची नोंद झाल्याचे उघड झाले. या योजनेच्या २६ लाख ३४ हजार अपात्र लाभार्थी आढळल्या. यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांचा पुणे जिल्हा आघाडीवर आहे. या जिल्ह्यात २ लाख ४ हजार अपात्र महिलांनी योजनेचा लाभ घेतला आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री पवार यांना विचारल्यावर त्यांनी मग आता योजना बंद करू का? असे उलट विचारत उत्तर देण्याचे टाळून काढता पाय घेतला. सरकारने योजनेतील गैरव्यवहार लक्षात घेऊन सर्व लाभार्थ्यांची पुन्हा केवायसी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये ठाण्यात १ लाख २५ हजार, नाशिकमध्ये १ लाख ८६ हजार ८००, छत्रपती संभाजीनगरात १ लाख ४ हजार ५००, सोलापुरात १ लाख ४ हजार, नागपुरात ९५ हजार ५००, साताऱ्यात ८६ हजार, बीडमध्ये ७१ हजार, अमरावतीत ६१ हजार आणि अहिल्यानगरात २५ हजार ७५६ अपात्र महिलांच्या नोंदी आढळल्या आहेत.

## आरक्षणासाठी ही अंतिम लढाई

### मुंबईत येण्यावर मनोज जरांगे ठाम

■ बीड

**मराठा** समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी २७ ऑगस्टला सकाळी १० वाजता आंतरवालीतून मुंबईला निघायचे. आंदोलनात जाळपोळ किंवा दगडफेक करून आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. तरीही आपण मुंबईत गणपती बाप्पाला घेऊन गुलाल उधळायचा, असा ठाम निर्धार आज मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांनी व्यक्त केला.

बीडच्या मांजरसुंबा येथे झालेल्या सभेत जरांगे यांनी आरक्षणाच्या तयारीची शेवटची आढावा सभा घेतली. यावेळी त्यांनी आपल्या सभेतील डीजे बंद करण्यास सांगितल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांना त्रास देऊ नये. पोलीस अधिकाऱ्यांच्या खांद्यावरून बंदूक चालवू नये. तुम्हाला फडणवीसांचे आदेश आहेत का? सत्ता आणि सरकार बदलत असते, हे लक्षात ठेवा. डीजे बंद करून दंगल घडवण्याचा प्रयत्न हा फडणवीस यांचे षड्यंत्र आहे. सभेत डीजे बंद केला, तर बीडमध्ये पान ७ वर

## राज्यभरात गणेशोत्सवात

### जोरदार पाऊस कोसळणार

■ मुंबई

**भारतीय** हवामान खात्याने येत्या २५ ऑगस्टपासून राज्याच्या अनेक भागांत पावसाचा इशारा दिला आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मध्य महाराष्ट्रात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरावर हवेचा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे हा पाऊस कोसळणार आहे. मात्र, गेल्या आठवड्यात कोसळलेल्या पावसापेक्षा या पावसाचे प्रमाण कमी असेल. २५ ते २८ दरम्यान कोकणाच्या किनारपट्टीवर मुसळधार पाऊस कोसळणार असून, २४ तासांत १०० मीमी पाऊस पडेल, असा अंदाज आहे. २६ ते २८ ऑगस्ट या दोन दिवसांत ओडिशा, पश्चिम बंगालसह देशाच्या इतर काही भागांतही अतिवृष्टीची शक्यता आहे.

## गणेशभक्तांचे हाल! ठाणे स्थानकात २५ तास रांगेत

■ ठाणे

गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने कोकणवासीयांची गावाकडे जाण्याची मोठी धावपळ सुरू झाली आहे. मात्र प्रचंड गर्दीमुळे प्रवाशांचे हाल होत आहेत.

काल रात्री ठाणे स्टेशनवर मांडवी एक्स्प्रेससाठी प्रवाशांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. अनेक प्रवासी तब्बल २४ तास आधीपासूनच रांगेत उभे होते. तर काही कुटुंबांनी थेट फलाटावरच बस्तान मांडून रात्र काढली. त्यामुळे महिला, लहान मुले व वृद्धांचे हाल झाले. शासनाकडून गणेशोत्सवासाठी विशेष गाड्या



चालवल्या जात असल्या, तरी बुकिंग सुरू होताच तिकिटे संपतात. त्यामुळे अनेक प्रवाशांना जनरल डब्यांचा आधार घ्यावा लागतो. कोकणात जाणाऱ्या कोकणकन्या एक्स्प्रेस, तुतारी एक्स्प्रेस, मांडवी एक्स्प्रेस आणि कोकण विशेष गाड्यांमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळत आहे. जनरल डब्यातून प्रवास करण्यासाठी प्रवाशांना एक दिवस आधीच ठाणे स्थानकात पोहोचून रांगेत उभे राहावे लागत आहे. रेल्वे प्रशासनाने जास्तीत जास्त जनरल डबे जोडावेत, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## टेस्ट स्पेशालिस्ट चेतेश्वर पुजाराची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

■ नवी दिल्ली

**भारतीय** क्रिकेट संघाचा विश्वासार्ह टेस्ट फलंदाज चेतेश्वर पुजाराने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्व फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियावर भावनिक पोस्ट करत त्याने हा निर्णय जाहीर केला. तो म्हणाला की, भारतीय जर्सी घालणे, राष्ट्रगीत गाणे आणि प्रत्येक वेळी मैदानात सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करणे या भावना शब्दांत मांडता येणार नाहीत. मात्र प्रत्येक चांगल्या गोष्टीचा शेवट असतोच. मी



भारतीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून निवृत्त होत आहे.

पुजाराने २०१० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. २०२३ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर त्याला संघातून वगळण्यात आले. त्यानंतर त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर एकही सामना खेळलेला नाही. त्याच्या १३ वर्षांच्या कारकिर्दीत त्याने भारतासाठी एकूण १०३ कसोटी आणि ५ एकदिवसीय सामने खेळले. सविस्तर वृत्त पान-४ वर

## तरुणाने राहुल गांधींचे चुंबन घेत पूर्णियामध्ये सुरक्षा कडे तोडले



■ पूर्णिया

**लोकसभेतील** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सुरक्षेचे कडे तोडत एका तरुणाने चक्क त्यांचे चुंबन घेतले. काही कळायच्या आत ही घटना घडली. त्यामुळे सुरक्षा दलाच्या जवानांची एकच तारांबळ उडाली. जवानांनी तरुणाला ताब्यात घेत त्याच्या कानाखाली लगावली.

मतदारयाद्यांतील घोळाविरोधात राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मतदार हक्क यात्रा काढली असून, आज याचा आठवा दिवस आहे. या यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी स्वतः दोन किलोमीटर दुचाकी चालवली. बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादवही वेगळ्या दुचाकीवर होते. तेजस्वी यांच्या पाठीमागे सुरक्षारक्षक होता, तर गांधींमागे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम बसले होते. याचवेळी राहुल गांधींचे त्यांच्या चाहत्याने चुंबन घेतले.

पूर्णियाहून ही यात्रा अररियाकडे पान ७ वर

## मंदिरांतील राजकारणावर केरळ उच्च न्यायालयाची बंदी

### देवस्थान समित्यांना मोठा झटका

■ कोची

**मंदिरांतल्या** राजकारणावरून केरळ उच्च न्यायालयाने देवस्थान समित्यांना मोठा झटका दिला. मंदिरांमध्ये कोणत्याही परिस्थितीत राजकीय घडामोडी नकोत, असे स्पष्ट दिशानिर्देश तीन प्रमुख देवस्थान मंडळांना दिले. एर्नाकुलम येथील एन. प्रकाश यांच्या याचिकेवर तीन न्यायमूर्तींच्या पीठाने त्रावणकोर, कोचीन आणि मलबार देवस्थान मंडळ यांना हे निर्देश दिले.

कोझिकोड येथील ताली मंदिर, अटिंगल येथील श्री इंदिलयप्पन मंदिर आणि कोल्लममधील कडक्कल देवी मंदिर यासारख्या विविध मंदिर परिसरांचा वापर राजकीय घडामोडींना चालना देण्यासाठी होत आहे. धार्मिक ठिकाणी अशा घडामोडी अयोग्य आणि भाविकांच्या भावनांना ठेच पोहोचवणाऱ्या आहेत, असे या याचिकेत म्हटले होते.

मलबार देवस्थान मंडळाने युक्तिवाद केला, की मंदिरातील पारंपरिक पूजा, विधी आणि रूढी-परंपरांशी संबंधित आयोजनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रम अथवा उपक्रमांच्या निवडीचे नियमन करण्यासाठी न्यायालयाने निर्देश जारी करणे व्यवहार्य नाही. धार्मिक संस्थान (दुरुपयोग निवारण) अधिनियम, १९८८ मधील तरतुदींचे उल्लंघन करून मंदिर व त्याच्या परिसराचा गैरवापर करणे या कायद्यानुसार दंडनीय आहे आणि त्यासाठी न्यायालयाकडून स्वतंत्र निर्देशांची गरज नाही. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने म्हटले की, धार्मिक संस्थान अधिनियमानुसार कोणतेही मंदिर किंवा त्याचे व्यवस्थापक परिसराचा उपयोग कोणत्याही राजकीय प्रचारासाठी करणार नाहीत आणि करू देणार नाहीत.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

HDFC बँक जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार: 17500-35000 संपर्क : **7758908779** {NC251939}

अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर विलेपार्ले पार्लरसाठी अनुभवी मुलगी पाहिजे **9029779889** {NC252017}

सिक्युरिटी गार्डस पाहिजेत. पगार १५,०००, शिक्षण, अनुभव, वयाची अट नाही. **9930160716** {NC252015}

लोअरपरेल डेलीवेजेस रोज 600/- बुधवारी पगार, ट्रेनपास + ओव्हरटाईम, काम 8 ते 5, बिल्डिंगवरील टाक्यांची सफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांनी संपर्क **9821819036, 9320080200** {NC252005}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC252043}

परळ/प्रभादेवी प्रतिष्ठित साईटवर सिक्युरिटी गार्ड, पगार २०,०००/- ₹, सुपरवायझर, पगार २३,०००/- ₹ त्वरित पाहिजेत. (१२ तास) आठवड्याची एक सुट्टी संपर्क : G9 सिक्युरिटी फोर्स 42/A, शिवसेना शाखेसमोर, बीडीडी चाळ, बावला मशीदजवळ, करी रोड, पश्चिम, मुंबई - 13. **8591979287 / 8591979288 / 8591979284** {NC251979}

प्युनच्या जागेसाठी मुले पाहिजेत. शिक्षण 10वी ते 12वी. वयोमर्यादा 20-30. Accotax Consultancy Services 7, हालिमा बिल्डींग, तिसरा मजला, नानाभाई लेन, फोर्ट. मुंबई- 400001. फोन नं.:- **9819830286** {NC252014}

बदलापूर येथे राहण्यासाठी २४ तासांची महिला आवश्यक आहे. पगार/ जेवण/ वेगळी खोली. **8446201979/ 9167891007.** {NC252013}

## पाहिजेत

मुंबई, ठाणेमध्ये पेशंटकेअर होम ड्यूटीसाठी आया, बाई, वॉर्डबॉय पाहिजेत. **8291860224 / 82911 52695** {NC251989}

प्रिंटींग प्रेससाठी प्रॉडक्शन मॅनेजर, फिडरमन आणि प्रिंटर पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **8591420902** {NC252016}

ठाणेयेथे रात्रं दिवस पाळीसाठी शिकाऊ ५० नर्स पाहिजेत **8108698447/ 7021297889** {NC252050}

**पाहिजेत**
मुंबई, ठाणे, नवी मुंबई व उर्वरित कोकणात नामांकित कंपनीला कुशल जबाबदार व ऊर्जावान उमेदवार हवेत.
**ड्रायवर**
- वैध LMV (Light Motor Vehicle) ड्रायव्हिंग लायसन्स
- स्थानिक रस्त्यांची चांगली माहिती
- सुरक्षित व वेळेत गाडी चालविण्याची सवय

**लॅब असिस्टंट**
- प्रयोग शाळेतील मूलभूत कामकाजाचे ज्ञान
- वैध LMV (Light Motor Vehicle) ड्रायव्हिंग लायसन्स
- शिकण्याची व टीमसोबत काम करण्याची तयारी

- इंग्रजी, हिंदी व मराठी वाचन आवश्यक
- किमान १०वी उत्तीर्ण
- आकर्षक पगार व सुविधा
- लवचिक वेळ/ निश्चित वेळ पर्याय
- तात्काळ जॉइनिंग ला प्राधान्य
- कोणतेही नोंदणी शुल्क नाही
- निवड झाल्यास ट्रेनिंग सहित राहत्या घरा जवळ थेट भरती.

संपर्क: **9225541056**
ईमेल: **buthellotransport@gmail.com**
ऑफिस पत्ता: शॉप न. 1, शेल्टर अपा, प्रीमियर रोड, कुर्ला (प.), मुंबई.

**9869028742** घर जेवणाकरिता बाई पाहिजे. ग्रान्ट रोड ईस्ट मुंबई नं. ८. {NC252045}

प्युन पाहिजेत. डॉ.कुरेशी मेडिकल सेंटर, दुसरा मजला, मर्क्युरी अपार्टमेंट, 183/191 डंकन रोड, राजास्थान ज्वेलर्ससमोर, दोन टाकीजवळ, मुंबई: 400008. इंटरव्यू वेळः 12.00 pm- 2.00 pm कामाची वेळः सकाळी 9.45-सायंकाळी 6.45 रविवार सुट्टी. पगार मुलाखतीवर आधारित.: **9870252274** {NC252052}

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (24,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC252054}

ग्रॉसरी पॅकिंग जॉब. पगार 17,000, शिक्षण, अनुभव, वयाची अट नाही. **7718852055**

## Situation Vacant

Hiring Deep Cleaners Hallmark Services, in Mumbai, is looking for Deep Cleaners on a per-day basis. contact: Mr. Ravi K – **+91 9930620774** or Mr. Rakesh S - **+91 9833025532.** {NC252010}

Join Hallmark Services! We're hiring Housekeepers, Butlers, Pantry Boys, Supervisors in Mumbai. Contact Mr. Rajesh: Ph: **+91 9930620774.** {NC252011}

Urgent Need Computer operator - 1 Female Delivery boy 2 R B & co. Pharma Dhobitalav Mumbai - 2 Contact: **9619076540** {NC252056}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251851}

## शेअर मार्केट

शेअरमार्केट शिका कमवा आमच्या सोबत काम करा ठाणे **9594221848/ 9082917354** {NC252051}

## गुंतवणूक विषयक

आमच्या जीवन विम्यात गुंतवणुक करून अनिश्चितेच्या आणि फसवणुकीच्या जगात मिळवा जीवनाची सुरक्षा आणि पैशांच्या समृद्धीची दुहेरी खात्रीलायक योजना - **9373956687** {NC251993}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251966}


# उत्सव म्हणजे नाच, गाणी, डीजे नव्हे

**गणेशोत्सव हे महाराष्ट्राचे वैभव आहे. गणपती ही बुध्दीची देवता आहे. महाराष्ट्रात घरोघरी गणेशाची स्थापन करून पूजन केले जाते. दीड दिवसांपासून दहा दिवसांपर्यंत घरोघरी गणेश मूर्तीची पूजा केली जाते. गणेशोत्सवाच्या काळात कुटुंबातील सारे जण एकत्र असतात, रोज सकाळी व सायंकाळच्या आरतीला आवर्जून उपस्थित राहतात. घरोघरी गणपतीपुढे आरास - सजावट केली जाते. रोज फुले व प्रसाद ठेवला जातो. गणेशोत्सवात साऱ्या महाराष्ट्रात भक्तिमय वातावरण असते. मग रस्त्यावर साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवात आणि मिरवणुकांमधे धांगडधिंगा का घातला जातो? कानठळ्या बसविणाऱ्या आवाजात गाणी का लावली जातात? गणपतीपुढे हिडिस फिडिस नृत्य का केले जाते? भक्तिगीतांपेक्षा हिंदी चित्रपटातील नाच-गाण्यांचा वर्षाव का केला जातो? भलेमोठे मंडप घालून रस्ते का अडवले जातात? आणि गणेशोत्सवाच्या दहा दिवसात वारेमाप खर्चाची उधळपट्टी का केली जाते?**



**डॉ. सुकृत खांडेकर**

श्रावण महिना सुरू झाला की, सण आणि उत्सवांची मालिका सुरू होते. दहिहंडीच्या दिवशी दुपारी बारा नंतर मुंबईचे अनेक रस्ते बंद होतात. गोविंदांची शेकडो पथके बसेस व ट्रक-टेम्पोमधून दहिहंडी फोडण्यासाठी मुंबई-ठाण्यात फिरत असतात. पन्नास हजारांपासून पंचवीस लाखांपर्यंत हंडी फोडणाऱ्या पथकांवर बक्षिसांचा वर्षाव केला जातो. अशी मोठमोठी बक्षिसे लावणाऱ्यांमधे राजकीय पक्षाचे नेते आणि लोकप्रतिनिधी असतात. राज्याचे अनेक आजी-माजी मंत्रीही त्यात आघाडीवर दिसतात. पुढाऱ्यांच्या छब्या असलेले टी-शर्ट्स घालून गोविंदांची पथके मोठ्या उत्साहात फिरत असतात. आता तर नऊ आणि दहा थरांचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होताना दिसतात. अनेक दहीहंडी कार्यक्रमांचे वृत्तवाहिन्यांवर दिवसभर थेट प्रक्षेपण केले जाते. अनेक ठिकाणी चंदेरी दुनियेतील अभिनेते व अभिनेत्री तिथे हजेरी लावतात. मंचावर सादर होणाऱ्या नाच-गाण्यांच्या कार्यक्रमात अनेक नामवंत कलाकार हजेरी लावतात. हे कलावंत तिथे येण्यासाठी किती बिदागी घेतात याच्या आकेडवारीची नेहमीच उघड चर्चा ऐकायला मिळते. दोन पाच लाखांपासून ते पंधरा-वीस लाखांपर्यंत हे आकडे ऐकायला मिळतात. यावर्षी दहीहंडी उत्सवात चारशे गोविंदा तरी जखमी झाले आणि चार जणांचा मृत्यू झाला. दरवर्षी तीनशे गोविंदा तरी जखमी होत असतात. काहींचे मृत्यू होतात. या गोविंदाच्या घरची परिस्थिती काय असते? जखमी गोविंदांचे पुढे काय होते? त्यांना विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळते काय? त्याचे पुढे भविष्य काय? यावर कधी चर्चा होत नाही. दहीहंडी झाली की गणेशोत्सव. पुन्हा नाच, गाणी, डीजेच्या मोठ्या आवाजात सारे दंग झालेले दिसतात.

महापुरुषांच्या जयंती किंवा पुण्यतिथीला लहान मोठ्या शहरात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या मिरवणुका निघत आहेत. महापुरुषांचे फोटो लावलेले फ्लोट पुढे ठेवायचे व मागे डीजेच्या तालावर नाचायचे. हेच दृश्य सर्वत्र दिसते. एवढेच नव्हे तर हातात मद्याचे ग्लास आणि हातात सिगारेटी घेऊन बेभान झालेल्या तरुणांचे जथ्थेही दिसू लागले आहेत. त्यांना आवरण्याचा कोणी प्रयत्न केला तर तुम्ही कोण सांगणार, आज आमचा दिवस आहे, आम्ही कसेही वागू ...अशी उत्तरे दिली जातात. आपल्या नाचगाण्यामुळे व धिंगाण्यामुळे रस्त्यावरची वाहतूक दोनदोन चारचार तास ठप्प होते आहे याचे कुणालाच भान नसते. वाहतूक ठप्प झाल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतात, पण कारवाई कुणावरच होत नाही. तक्रार आली तर कारवाई करू, असा पोलिसांचा खाक्या असतो. कोणी तक्रार केली तर त्याचेच नाव धिंगाणा घालणाऱ्या लोकांना समजते. यामागे कोण असते हे वेगळे सांगायला नको. रस्त्यावर वारंवार निघणाऱ्या मिरवणुकांना परवानगी का दिली जाते, कोण देतो, असे प्रश्न विचारायचे नसतात. मिरवणुका नसतानाही मुंबई, पुणे अशा सर्वच शहरात रोज वाहतूक कोंडी असतेच. मग आगमन असो वा विसर्जन, जयंती असो पुण्यतिथी या निमित्ताने निघणाऱ्या मिरवणुकांवर निदान वेळेचे तरी बंधन नको का?

दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रात गरबा, राजकीय पक्ष व त्याच्या बड्या नेत्यांच्या सभा अशा सर्वच ठिकाणी हजारो तरुण मुले उत्साहाने सहभागी झालेली दिसतात. सर्वच उत्सव, कार्यक्रम, सभा, मिरवणुकांमधे सहभागी व्हायला, नाचायला, घोषणा द्यायला या तरुणांना वेळ कसा मिळतो? त्यांचे शिक्षण काय? ही तरुणाई काय काम करते? कमाई काय? उत्पन्न काय ? शिक्षण, रोजगार आणि सर्वात महत्त्वाचे संस्कार या तरुणांवर आहेत का? गेल्या काही वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या आगमनाच्या मिरवणुका सुरू झाल्या आहेत. त्यामुळे मुंबईतील रस्ते पुन्हा वाहतूक कोंडीत सापडू लागले आहेत. आगमन व विसर्जन मिरवणुका, भव्य आरास, भव्य सजावट, मोठे मांडव, रोज कार्यकर्त्यांची चहापानाची व्यवस्था, विद्युत रोषणाई, कलावंताची बिदागी, पाहुण्यांची सरबराई, रोजचा प्रसाद, आरती किती प्रचंड खर्च होत असतो. त्यातून समाजाला विशेषतः तरुणाईला काय मिळते? लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो ब्रिटिशांच्या विरोधात जनजागृतीसाठी. लोकशिक्षण हा मुख्य हेतू होता. पण आज डीजे, नाच, गाणी, लाऊड स्पिकर्सवरील मोठाले आवाजाने गणेशोत्सव व्यापला आहे. गणेशोत्सवात सर्व रस्त्यांवर राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांचे होर्डिंग आणि बॅनर्स सर्वत्र झळकत आहेत. गणेश भक्तांचे स्वागत अमराठी धनवंतांकडून व परप्रांतीय लोकांकडूनच मोठ्या प्रमाणावर फलकांवरून होत आहे. गणेशोत्सवाच्या काळात आरास, सजावट, फळे, फुले यांची विक्री प्रचंड होते. विक्रेते कोण आहेत, ते सर्वाधिक अमराठी आहेत असे लक्षात येते. वडापाव, बुर्जी पाव, आम्लेट पाव, चाईनिज, डोसा, पिझ्झा, सँडविच आदी खाद्यपदार्थांच्या गाड्या रात्रभर पदपथावर व रस्त्यांवर गर्दीने वेढलेल्या असतात. हे विक्रेते सर्वाधिक अमराठी आहेत. उत्सवाच्या काळात हजारो मराठी तरुण मुलांचे जथ्थे रस्त्यावर नाचत असतात आणि पाण्याच्या बाटल्या व वडापाव विकून अमराठी पैसे कमावत असतात. अशा उत्सवातून आपण काही शिकणार आहोत की नाही? डीजेचे फॅड इतके वाढले आहे की, ध्वनिप्रदुषणाने सारी मुंबई व्यापली आहे. आजही शांतता प्रिय मुंबईकरांची संख्या लक्षावधी आहे. काहीही झाले तरी दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर गेलेच पाहिजे, अशी संख्याही लक्षावधी आहे. घरात आजारी माणसे असतात. वयोवृध्द आईवडील असतात. अभ्यास करून स्पर्धा परीक्षेला बसणारी हजारो मुले असतात. त्यांचा कोणी विचारच करणार नाही का? डीजे, नाच, गाणी, धांगडधिंगा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणीही राजकीय नेता किंवा पक्ष प्रयत्न करणार नाही. कारण नाचणारे, गाणी लावणारे हे बेभान लोक ही त्यांची व्होट बँक आहे. आता तर चार महिन्यांवर महापालिका, नगरपरिषदांच्या निवडणुका आहेत. कानठळ्या बसविणारा डीजे नको असे सांगायला कोणी पुढे येणार नाही. राज्यकर्त्यांना ध्वनिप्रदूषण आणि वाहतूक कोंडी रोखण्यात किती रस आहे हे दरवेळी अनुभवायला मिळतेच. मग प्रामाणिक, शांतताप्रिय समाजाने व करदात्या मुंबईकरांनी उत्सवाच्या काळात अपेक्षा तरी कोणाकडे करायची? ●●●

## आजचे राशी भविष्य

सोमवार दि. २५ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | गृहउद्योग व्यवसायिकांना चांगला दिवस राहील. नोकरीसाठीच्या प्रयत्नांना यश मिळेल. स्पर्धापरीक्षा देणाऱ्यांसाठी अनुकूल दिवस. |
| वृषभ | मनाविरुद्ध काही घटना घडू शकतात. त्यामुळे निराश होऊ नका. प्रिय व्यक्तींशी वादविवाद टाळा. गुंतवणूक करताना खबरदारी घ्यावी. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात एखादी नवीन संधी चालून येईल. मात्र कामाचा ताण राहील. घरातील वातावरण तणावाचे राहू शकते. |
| कर्क | कार्यक्षेत्रात काही धाडसी निर्णय घ्यावे लागतील. गुंतवणूक करताना विचारपूर्वक निर्णय घ्या. काहींना प्रवासाचे योग येतील. |
| सिंह | मनात सकारात्मक विचार ठेवा. तुमच्या बोलण्याने काही गोष्टी मार्गी लागू शकतात. अनपेक्षित खर्च होऊ शकतो. |
| कन्या | कार्यक्षेत्रात आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नोकरीमध्ये नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. सरकारी नियमांचे पालन करणे आवश्यक. |
| तूळ | व्यवसायामध्ये नवीन बदल फायदेशीर ठरू शकतात. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी लागेल. मित्रमंडळींचे सहकार्य राहील. |
| वृश्चिक | एखाद्या व्यवहारात फायदा होऊ शकतो. घरातील ज्येष्ठांची काळजी वाटेल. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. |
| धनु | व्यवसायामध्ये आर्थिक उलाढाल करताना सावधगिरी बाळगावी. कमिशन व्यवसायिकांना लाभदायक दिवस. नोकरीत यश मिळवाल. |
| मकर | कार्यक्षेत्रात नवीन आव्हाने उभी राहू शकतात. नोकरीनिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. वाहने चालवताना काळजी घ्यावी. |
| कुंभ | नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. जोडीदाराशी विनाकारण मतभेद टाळावेत. आर्थिक व्यवहार जपून करावेत. |
| मीन | अधिक उत्साहाने कार्यरत राहाल. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल. प्रिय व्यक्तींच्या गाठीभेटी होतील. |

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 34 • तिकीट कि. रु. 10/- • सोडत दिनांक 24/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-09 : 0231**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/- : 3335, 4404, 4498, 4604, 7775

तिसरे बक्षिस रु. 1000/- : 1058, 2236, 3901, 3906, 4081, 6233, 7088, 7420, 8663, 9376

चौथे बक्षिस रु. 500/- : 0196, 3630, 5463, 6112, 6119, 6202, 6213, 7412, 8378, 8669

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0026 | 1091 | 2042 | 3086 | 4171 | 5036 | 6033 | 6977 | 7890 | 8954 |
| 0058 | 1100 | 2196 | 3099 | 4184 | 5205 | 6044 | 7089 | 7978 | 9151 |
| 0104 | 1104 | 2258 | 3345 | 4282 | 5233 | 6166 | 7132 | 8145 | 9186 |
| 0210 | 1154 | 2269 | 3578 | 4410 | 5255 | 6203 | 7199 | 8342 | 9244 |
| 0340 | 1228 | 2326 | 3619 | 4434 | 5292 | 6231 | 7217 | 8391 | 9262 |
| 0495 | 1425 | 2396 | 3650 | 4453 | 5425 | 6323 | 7247 | 8478 | 9462 |
| 0553 | 1461 | 2486 | 3849 | 4503 | 5685 | 6526 | 7278 | 8484 | 9485 |
| 0559 | 1464 | 2610 | 3895 | 4506 | 5796 | 6626 | 7307 | 8572 | 9568 |
| 0733 | 1501 | 2706 | 3954 | 4644 | 5804 | 6660 | 7370 | 8594 | 9589 |
| 0846 | 1508 | 2736 | 3999 | 4727 | 5845 | 6704 | 7436 | 8615 | 9745 |
| 0865 | 1593 | 2779 | 4032 | 4905 | 5868 | 6766 | 7727 | 8783 | 9818 |
| 0880 | 1600 | 2827 | 4035 | 4946 | 5870 | 6804 | 7780 | 8791 | 9829 |
| 0890 | 1615 | 2923 | 4106 | 4960 | 5920 | 6935 | 7850 | 8843 | 9911 |
| 0940 | 1710 | 2929 | 4140 | 4975 | 5953 | 6938 | 7887 | 8887 | 9968 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रसृतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 34 • तिकीट कि. रु. 15/- • सोडत दिनांक 24/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MO-05 : 2048**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 1000/- : 2234, 2236, 2799, 2961, 2972, 3634, 4183, 4597, 5565, 5690

तिसरे बक्षिस रु. 500/- : 1130, 1275, 1506, 2617, 2688, 3379, 3395, 4619, 4853, 5266

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1091 | 1901 | 2625 | 4217 | 4842 |
| 1106 | 1960 | 2666 | 4234 | 5411 |
| 1113 | 1975 | 2672 | 4294 | 5432 |
| 1129 | 2000 | 2820 | 4305 | 5447 |
| 1188 | 2221 | 3177 | 4439 | 5458 |
| 1525 | 2226 | 3311 | 4442 | 5629 |
| 1600 | 2375 | 3607 | 4485 | 5667 |
| 1604 | 2379 | 3803 | 4600 | 5691 |
| 1621 | 2406 | 3958 | 4644 | 5785 |
| 1776 | 2432 | 4004 | 4664 | 5819 |
| 1889 | 2448 | 4077 | 4731 | 5859 |
| 1896 | 2482 | 4106 | 4826 | 5917 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रसृतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. २५/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ४ | ० | ५ |
| ४१ | ०१ | ५१ |
| ४६ | ०६ | ५६ |
| १३० | १३६ | १६८ |
| २५७ | २८० | २५० |

# धनगर वाड्यावर बिबट्याच्या हल्ल्यात पिता-पुत्र जखमी

■ जुन्नर

**तालुक्यातील** वडगाव कांदळी हद्दीतील भुजबळवस्तीवर असलेल्या धनगर वाड्यावर मध्यरात्री बिबट्याच्या हल्ल्यात पिता-पुत्र गंभीर जखमी झाले. त्याचवेळी वाड्यावर असलेल्या चार कुत्र्यांनी मालकाला वाचविण्यासाठी बिबट्याशी निकराची झुंज दिली. त्यात बिबट्याचा मृत्यू झाला. वडगाव कांदळी येथील सावळेराम करगळ या धनगराच्या वाड्यावर काल रात्री साडेबाराच्या सुमारास बिबट्याने शिरकाव केला. त्यावेळी ही गोष्ट सावळेराम यांच्या मुलाच्या लक्षात येताच तो आरडाओरड करत मेंढ्यांच्या दिशेने धावला. त्याचवेळी बिबट्याने मुलावर हल्ला चढवला. हे पाहून वडील सिताराम त्याला वाचविण्यासाठी गेले. बिबट्याने त्यांच्यावरही हल्ला केला. त्यानंतर

**कुत्र्यांच्या हल्ल्यात बिबट्या ठार**

वाड्यावर असणाऱ्या चार कुत्र्यांनी आपल्या मालकांना वाचविण्यासाठी बिबट्याच्या दिशेने धाव घेतली. त्यामुळे पळून जाणारा बिबट्या वाड्याभोवती लावलेल्या सहा फूट उंचीच्या तारेच्या कुंपणात अडकला. ही संधी साधत चार कुत्र्यांनी बिबट्यावर हल्ला चढविला. त्यात ४ ते ५ वर्षांच्या या नर बिबट्याचा मृत्यू झाला.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत सायं. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 34 • तिकीट कि. रु. 20/- • सोडत दिनांक 24/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-01 : 4224**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 2000/- : 0401, 0666, 1301, 1407, 1607, 2226, 2625, 5160, 7763, 9956

तिसरे बक्षिस रु. 1000/- : 0090, 0645, 1664, 2632, 2858, 4279, 5016, 7802, 9207, 9643

चौथे बक्षिस रु. 500/- : 2129, 2456, 3492, 3505, 3679, 5166, 6816, 7495, 7582, 8355

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 300/- | 0663 | 1715 | 2612 | 3588 | 4554 | 5517 | 6570 | 7517 | 8250 | 9319 |
| 0002 | 0693 | 1771 | 2727 | 3719 | 4555 | 5582 | 6588 | 7537 | 8308 | 9324 |
| 0006 | 0740 | 1829 | 2776 | 3763 | 4565 | 5583 | 6608 | 7558 | 8338 | 9346 |
| 0024 | 0790 | 1871 | 2796 | 3873 | 4613 | 5593 | 6632 | 7673 | 8379 | 9359 |
| 0040 | 0900 | 1894 | 2880 | 3913 | 4665 | 5599 | 6636 | 7679 | 8382 | 9409 |
| 0050 | 0968 | 1911 | 3014 | 3973 | 4688 | 5622 | 6802 | 7707 | 8445 | 9411 |
| 0081 | 0970 | 1919 | 3048 | 4042 | 4747 | 5754 | 6827 | 7711 | 8482 | 9481 |
| 0104 | 1027 | 2041 | 3173 | 4045 | 4882 | 5818 | 6833 | 7727 | 8561 | 9492 |
| 0131 | 1113 | 2069 | 3210 | 4144 | 4906 | 5854 | 6960 | 7750 | 8675 | 9502 |
| 0204 | 1114 | 2136 | 3220 | 4307 | 4918 | 5875 | 6992 | 7751 | 8681 | 9585 |
| 0225 | 1115 | 2203 | 3238 | 4326 | 4949 | 5933 | 7041 | 7759 | 8710 | 9649 |
| 0256 | 1129 | 2227 | 3269 | 4363 | 5008 | 6055 | 7134 | 7857 | 8752 | 9655 |
| 0307 | 1157 | 2228 | 3298 | 4443 | 5045 | 6063 | 7202 | 7903 | 8780 | 9689 |
| 0330 | 1181 | 2245 | 3301 | 4461 | 5115 | 6118 | 7213 | 7953 | 8846 | 9693 |
| 0435 | 1411 | 2278 | 3306 | 4462 | 5154 | 6356 | 7242 | 7963 | 8859 | 9699 |
| 0453 | 1431 | 2281 | 3346 | 4466 | 5254 | 6463 | 7247 | 8014 | 8862 | 9829 |
| 0476 | 1501 | 2320 | 3347 | 4471 | 5312 | 6465 | 7333 | 8069 | 8881 | 9937 |
| 0518 | 1512 | 2362 | 3423 | 4480 | 5324 | 6484 | 7421 | 8087 | 8899 | 9963 |
| 0528 | 1531 | 2507 | 3480 | 4488 | 5353 | 6486 | 7428 | 8108 | 9233 | 9969 |
| 0577 | 1614 | 2542 | 3484 | 4505 | 5374 | 6563 | 7439 | 8112 | 9262 | 9998 |
| 0608 | 1621 | 2545 | 3533 | 4524 | 5405 | 6566 | 7463 | 8239 | 9273 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रसृतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी


**वाचकांना सूचना**

दैनिक ‘नवाकाळ’ वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक ‘नवाकाळ’ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, ‘नवाकाळ’


# ११ वीसाठी कला शाखेच्या मुंबईत ५३ टक्के जागा रिक्त

■ मुंबई

**अकरावी** ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची ओपन टू ऑल पहिली विशेष फेरी पूर्ण झाल्यानंतर, मुंबई विभागातील कला शाखेच्या ५३.२७ टक्के जागा रिक्त राहिल्याचे समोर आले आहे. आतापर्यंत मुंबई विभागातील मुंबई, ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यांमध्ये मिळून कला शाखेच्या ७४ हजार ७५ जागांपैकी फक्त ३४ हजार ६१३ जागांवरच प्रवेश झाले आहेत. तीनही शाखा मिळून उपलब्ध असलेल्या चार लाख ५२ हजार १९७ पैकी केवळ दोन लाख ८२ हजार ५६२, म्हणजेच ६२.४८ टक्के जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून ३७.५२ टक्के जागा रिक्त आहेत. गेल्या काही वर्षांपासून मुंबई विभागात अकरावीसाठी कला शाखेकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाल्याचे चित्र आहे. यंदा मुंबई विभागात कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांसाठी मिळून चार लाख ५२ हजार १९७ रिक्त जागा होत्या.

# ३५ लाखांसाठी पत्नीला जाळले पोलीस गोळीबारात पती जखमी

■ नोएडा

**उत्तर** प्रदेशातील नोएडामध्ये ३५ लाख रुपयांच्या हुंड्यासाठी मुलासमोरच पत्नीला जिवंत जाळले. आरोपीला पोलिसांनी पकडले, पण ताब्यातून पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या पतीवर पोलिसांनी गोळ्या झाडल्या. त्यात पायाला गोळ्या लागून तो जखमी झाला.

गुरुवारी रात्री निक्की या महिलेच्या सहा वर्षांच्या मुलासमोरच तिला जाळण्यात आले. यावेळी निक्कीची बहीण कांचनही घटनास्थळी होती. बहिणीने निक्कीला नोएडा येथील एका खासगी रुग्णालयात नेले. तिथून तिला दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयात हलवण्यात आले. पण २१ ऑगस्टला निक्कीचा रस्त्यातच मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले.

# शस्त्रक्रियेनंतर पती-पत्नीचा मृत्यू डॉक्टरांवर हलगर्जीपणाचा आरोप

**पुणे- पुण्यातील** डेक्कन परिसरातील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये करण्यात आलेल्या लिव्हर ट्रान्सप्लांट शस्त्रक्रियेनंतर दाम्पत्याचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. बापू बाळकृष्ण कोमकर यांना त्यांच्या पत्नी कामिनी कोमकर यांनी लिव्हर दान केले होते. मात्र शस्त्रक्रियेनंतर अवघ्या दोन दिवसांत बापू यांचे निधन झाले, तर आठ दिवसांनी कामिनी यांचाही मृत्यू झाला. मागील आठवड्यात बुधवारी ही शस्त्रक्रिया करण्यात आली होती. शुक्रवारी म्हणजे दोन दिवसांतच बापू कोमकर यांचा मृत्यू झाला, तर शनिवारी कामिनी कोमकर यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कोमकर यांच्या नातेवाईकांनी सह्याद्री हॉस्पिटल आणि संबंधित डॉक्टरांवर गंभीर आरोप केले आहेत.


कोहिनूरचा विघ्नेश्वर


कुंभारवाड्याचा विघ्नहर्ता




गणपती बाप्पा मोरयाच्या जय घोषात गणेशोत्सव मंडळांनी उत्साहात लाडक्या बाप्पाची मूर्ती मंडपात नेली (सर्व फोटो: दीपक साळवी )

# आंध्रचे चंद्राबाबू नायडू देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री ठरले

■ नवी दिल्ली

**आंध्र** प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू हे ९३१ कोटी रुपयांहून अधिक संपत्ती असलेले भारतातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री ठरले आहेत, तर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या केवळ १५ लाख रुपयांच्या संपत्तीसह सर्वात कमी संपत्ती असणाऱ्या मुख्यमंत्री आहेत. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि नॅशनल इलेक्शन वॉच यांनी प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात ही माहिती समोर आली आहे.

देशातील २७ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेश अशा एकूण ३० विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करून हा अहवाल तयार करण्यात आला आहे.



■ ९३१ कोटींची संपत्ती
■ ममताजी गरीब मुख्यमंत्री

गेल्या निवडणुकीत लढण्यापूर्वी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांवरून ही माहिती घेण्यात आली आहे. आंध्रचे मुख्यमंत्री एन.चंद्राबाबू नायडू यांची एकूण संपत्ती ९३१ कोटी रुपये असून त्यांच्या खालोखाल पेमा खांडू (अरुणाचल प्रदेश): ३३२ कोटी रुपये, सिद्धरामय्या (कर्नाटक): ५१ कोटी रुपये, नेफ्यू रियो (नागालँड): ४६ कोटी रुपये, मोहन यादव (मध्य प्रदेश): ४२ कोटी रुपये यांचा क्रमवारीत श्रीमंत मुख्यमंत्री म्हणून नंबर लागतो. तर दुसरीकडे सर्वात कमी संपत्ती असलेल्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडे केवळ १५.३८ लाख रुपयांची संपत्ती आहे. त्यांच्यानंतर उमर अब्दुल्ला (जम्मू आणि काश्मीर): ५५ लाख रुपये, पिनाराई विजयन (केरळ): १.१८ कोटी रुपये, भजनलाल शर्मा (राजस्थान): १ कोटी रुपये आणि योगी आदित्यनाथ (उत्तर प्रदेश)१.५४ कोटी रुपये अशी सर्वात कमी संपत्ती असलेल्या मुख्यमंत्र्यांची नावे आहेत.

देश विदेश

# पीएमएल-एन आणि पीपीपी पोटनिवडणूक एकत्र लढवणार

■ इस्लामाबाद

**आगामी** पोटनिवडणूक पाकिस्तान मुस्लीम लीग (नवाज) आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी ) एकत्र लढवणार आहे. ९ मे २०२३ रोजी माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अटकेनंतर झालेल्या हिंसाचाराच्या खटल्यांमध्ये पीटीआयच्या ४ आमदारांना आणि ८ खासदारांना पाकिस्तान निवडणूक आयोगाने अपात्र ठरवले. आता या रिक्त झालेल्या जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. पाकिस्तान निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवले आहेत. संसदीय कामकाज मंत्री तारिक फजल चौधरी आणि रेल्वेमंत्री हनिफ अब्बासी यांनी पीपीपीचे एमएनए राजा परवेझ अश्रफ आणि महासचिव नय्यर बुखारी यांच्यासोबत इस्लामाबादमध्ये पत्रकार परिषदेत पोटनिवडणुकीत एकत्र उतरणार असल्याची घोषणा केली. हनिफ अब्बासी म्हणाले की, आम्हाला आमच्या कार्यकर्त्यांना आणि संपूर्ण पाकिस्तानला सांगायचे आहे की, आम्ही लोकशाहीवादी आहोत, पोटनिवडणुका लढवतील. आम्ही एकत्र निवडणूक लढवू. जिथे पीपीपीचा उमेदवार निवडणूक लढवत असेल तिथे पीएमएल-एन त्यांना पाठिंबा देईल आणि ते आम्हाला सहकार्य करणार आहेत.

# चीनमध्ये बांधकाम सुरू असलेला पूल कोसळला

■ बीजिंग

बारा कामगारांचा मृत्यू

**चीनच्या** किंघाई प्रांतात बांधकाम सुरू असलेला रेल्वे पूल कोसळला. यात १२ कामगारांचा मृत्यू झाला. या घटनेची महिती मिळताच बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. बेपत्ता झालेल्या चार जणांचा शोध युद्धपातळीवर सुरुच आहे.

किंघाई प्रांतात एका नदीवर रेल्वे पुलाचे बांधकाम सुरू आहे. यावेळी १६ कामगार पुलावर असताना एक केबल अचानक तुटली. त्यामुळे पूल हवेत लटकला. परिणामी सर्व कामगार नदीत कोसळले. या नदीतून १२ कामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. सध्या बेपत्ता झालेल्या ४ जणांचा शोध सुरू आहे. त्यांचाही नदीत बुडून मृत्यू झाला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हेलिकॉप्टर आणि पाण्याखालील रोबोटच्या मदतीने त्यांचा शोध सुरू आहे. अधिकाऱ्यांनी बचावकार्य रात्रीपासून सुरू ठेवले. नदीत प्रवाह तीव्र असल्यामुळे बचावकार्यात अडचणी येत आहे.

# गुरुवायर मंदिरात रील इन्फ्लुएन्सर अडचणीत

**कोची** -कोची येथील गुरुवायर श्रीकृष्ण मंदिरात रील बनवून ते समाजमाध्यमावर टाकल्याबद्दल इन्फ्लुएन्सर जस्मीन जाफर अडचणीत आली आहे. मंदिराच्या व्यवस्थापन समितीने तिच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. मंदिर समितीने म्हटले की, जस्मीन हिने मंदिरातील दोन महत्त्वाच्या पवित्र ठिकाणी या रीलचे चित्रीकरण केले. तिने येथील सरोवराच्या पायऱ्यांवर व मंदिराच्या आतील भागात हे चित्रीकरण केल्यामुळे मंदिराचे पावित्र्य नष्ट झाले आहे. या मंदिरात धार्मिक विधी करत असलेल्यांच्या भावना त्यामुळे दुखावल्या गेल्या. तिचे हे कृत्य केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आहे.

# म्हापसा, पणजी स्थानकातील रस्त्यांची तत्काळ दुरुस्ती करा

खासगी बसचालक संघटनेची मागणी

■ पणजी

**म्हापसा** आणि पणजी या दोन प्रमुख कदंबा बसस्थानकातील रस्त्यावर सर्वत्र खड्डे पडले आहेत. तरी या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी. तसेच या बस स्थानकावर वाहन चालक, प्रवासी आणि खासगी बस मालकांच्या सोयीसाठी घड्याळ बसवण्याची व्यवस्था करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा अखिल गोवा खासगी बसमालक संघटनेचे नेते सुदीप ताम्हणकर यांनी दिला आहे. यासंदर्भात कदंबा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक रोहन कासकर यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, संघटनेने आतापर्यंत या मागणीसाठी दोनदा निवेदने दिली आहेत. तरीही त्याची दखल घेतलेली नाही. या दोन्ही स्थानकातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या परिस्थितीचा बसचालक आणि प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच म्हापसा व पणजी या दोन्ही बसस्थानकांवर घड्याळ नसल्याने बसचालक तसेच प्रवाशांची गैरसोय होत आहे.

# नायगरा धबधब्याजवळ अपघात! एका भारतीयासह ५ जणांचा मृत्यू

■ न्यूयॉर्क

**अमेरिकेतील** जगप्रसिद्ध नायगरा धबधबा पाहून परतणाऱ्या पर्यटकांच्या बसला झालेल्या अपघातात एका भारतीयासह ५ जणांचा मृत्यू झाला. या बसमध्ये एकूण ५४ प्रवासी होते.

बसमध्ये बहुसंख्य भारतीय, चिनी व फिलीपाईन्सचे होते, अशी माहिती न्यूयॉर्क पोलिसांनी दिली आहे. नायगरा येथील धबधबा पाहून ही बस न्यूयॉर्कला परतत होती. त्यावेळी बफेलो भागात चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस शेजारच्या घळीत कोसळली. या अपघातात शंकर कुमार झा या ६५ वर्षीय भारतीय व्यक्तीचा मृत्यू झाला. ते बिहारमधील होते.

ब्रुन्विक येथील पिंकी चांगरानी यांचाही या अपघातात मृत्यू झाला आहे. बसमध्ये ५४ प्रवाशांबरोबर यात्रा कंपनीचे दोन सदस्यही प्रवास करत होते. तेही जखमी झाले आहेत.

बस उलटल्यामुळे काही प्रवासी बाहेर फेकले गेले. यातील जखमींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू असून त्यातील कोणीही गंभीर नसल्याची माहितीही पोलिसांनी दिली आहे. अपघातामुळे हा महामार्ग काही काळ बंद ठेवण्यात आला होता. न्यूयॉर्कच्या गव्हर्नरनी या घटनेची नोंद घेतली असून, अपघातातील सर्व जखमींची योग्य काळजी घेतली जाईल, असे आपल्या एक्सवर म्हटले आहे.



महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने श्रीपाद खानोलकर यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. हे नियुक्तीपत्र पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख यांच्या उपस्थितीत श्रीपाद खानोलकर यांना देण्यात आले.

# पाटणच्या नावडीत महिलांनी कोयनामाईची ओटी भरली

■ पाटण

**श्रावण** महिन्याच्या शेवटी तालुक्यातील नावडी वसाहत व परिसरातील महिलांनी जलपूजन म्हणून कोयनामाईची खणा-नारळाने, हळदी-कुंकवाने ओटी भरून पूजन केले.

मल्हारपेठ विभाग व मारूल हवेली परिसरातील असंख्य महिलांनी पूजन करून धार्मिक विधी केला. या महिला मंडळामध्ये महिला बचत गट, महिला आघाडी, महिला गृहिणी यांचा समावेश होता. कोयना नदी ही महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असून, शेतकऱ्यांसाठी बारमाही जीवनदायी आहे. वर्षभर नदी काठावर वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम होत असतात. अशाच पद्धतीने श्रावण महिन्याच्या शेवटी हा जलपूजन कार्यक्रम पार पडला.

# मटका अड्ड्यावरील छाप्यानंतर कणकवलीचे पोलीस निलंबित

■ सिंधुदुर्ग



**कणकवली** बाजारपेठेत सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर पालकमंत्री नितेश राणे यांनी छापा टाकल्यानंतर अवघ्या २४ तासांत पोलीस निरीक्षक अतुल जाधव यांना निलंबित करण्यात आले आहे. कोकण परिक्षेत्राचे महानिरीक्षक यांनी केलेल्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी कणकवली शहरातील मटका अड्ड्यावर अचानक छापा टाकत बेकायदेशीर धंद्यांविरोधात थेट कारवाई केली. या कारवाईने संपूर्ण शहरात आणि जिल्ह्यात खळबळ उडाली. पोलिसांसमोरच सुरू असलेले अवैध व्यवसाय, त्याला मिळणारे संरक्षण आणि यंत्रणांची निष्क्रियता यावर बोट ठेवले गेले. त्यानंतर शुक्रवारी सकाळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत पालकमंत्री नितेश राणे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जिल्ह्यातील अवैध धंद्यांना कोणतेही राजकीय किंवा प्रशासकीय संरक्षण मिळणार नाही. जो कोणी अधिकारी किंवा कर्मचारी अशा धंद्यांना पाठीशी घालेल, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

# ७० हजार कोटींच्या ६ पाणबुड्या भारत जर्मनीकडून खरेदी करणार

पाणबुड्या ३ आठवडे पाण्याखाली राहू शकतात

■ नवी दिल्ली

**भारत-पाकिस्तान** यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार मोठे पाऊल टाकणार आहे. हवाई दल आणि नौदलाची क्षमता वाढवण्यासाठी दोन करार केले जाणार आहेत. संरक्षण मंत्रालय आणि माझगाव डॉकयार्ड्स लिमिटेड हे जर्मनीकडून ६ प्रगत पाणबुड्या खरेदी करणार आहेत. या खरेदीसाठी जवळपास ७० हजार कोटी रुपये खर्च येऊ शकतो. प्रोजेक्ट ७५ इंडिया अंतर्गत भारतात बांधल्या जाणाऱ्या या पाणबुड्यांच्या खरेदीसाठी वाटाघाटी सुरू करण्यास सरकारने मान्यता दिली आहे.

दुसरा करार हा हवेतून जमिनीवर मारा करणारे इस्त्रायली क्षेपणास्त्र रॅम्पेजचा मोठा साठा खरेदी करण्यासाठी आहे. पाकिस्तानातील मुरीदके आणि बहावलपूर येथील दहशतवादी मुख्यालयांवर अचूक हल्ला चढवण्यामध्ये रॅम्पेज क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला. सुत्रांच्या मते, लवकरच जलदगती प्रक्रियेंतर्गत या ऑर्डर दिल्या जातील. आगामी सहा महिन्यांत वाटाघाटी पूर्ण होतील.

संरक्षण मंत्रालयाने जानेवारीमध्ये मुंबईतील माझगाव डॉकयार्डची जर्मन कंपनी थायसेनक्रुप मरीन सिस्टम्स, एअर इंडिपेंडेंट प्रोपल्शन सिस्टम यांच्यासोबत सहा पाणबुड्या बांधण्यासाठी भागीदार म्हणून निवड केली आहे. देशात पारंपरिक पाणबुड्यांचे डिझाईन आणि उत्पादन करण्यासाठी स्वदेशी क्षमता विकसित करणे हे संरक्षण मंत्रालयाचे उद्दिष्ट आहे. डिझेल-इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या पारंपरिक पाणबुड्या जास्त काळ पाण्याखाली राहू शकत नाहीत. त्यांना दर काही दिवसांनी पृष्ठभागावर यावे लागते आणि त्यांच्या बॅटरी चार्ज कराव्या लागतात. पृष्ठभागावर आल्याने त्या सहजपणे शत्रूच्या रडार आणि उपग्रह शोधाखाली येऊ शकतात. या समस्येवर मात करण्यासाठी एअर इंडिपेंडेंट प्रोपल्शन सिस्टम ही प्रणाली विकसित करण्यात आली. या प्रणालीने विकसित करण्यात आलेल्या पाणबुड्या ३ आठवडे पाण्याखाली राहू शकतात. भारतीय नौदलातून येत्या १० वर्षांत जवळपास १० पाणबुड्या निवृत्त होणार आहेत.

# आता अवजड मालवाहतूक वाहनांसाठी क्लिनरची अट रद्द

२९ ऑगस्टपर्यंत सूचना हरकती मागविल्या!

■ मुंबई

**राज्य** सरकारने अवजड मालवाहतूक वाहनांसाठी क्लिनर ठेवण्याची अट शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी मसुदा अधिसूचना जारी करण्यात आली असून, नागरिकांकडून २९ ऑगस्टपर्यंत सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. मात्र, ही सवलत फक्त ड्रायव्हर असिस्ट सिस्टम असलेल्या वाहनांसाठीच लागू राहणार आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री नाईक म्हणाले की, राज्यातील मालवाहतूक करणाऱ्या अनेक वाहनधारक संघटनांनी केलेल्या आंदोलनात चालकांसोबत सहायक म्हणजेच क्लिनर देण्याची अट शिथिल करावी, अशी आग्रही मागणी केली होती.

त्यांच्या मते सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाहननिर्मिती होत असल्यामुळे क्लिनरची शक्यतो गरज पडत नाही. त्यामुळे त्याचा विनाकारण खर्च वाढतो. तो खर्च कमी करण्यासाठी ही अट शिथिल करण्यात येत आहे.

# मुंबई-गोवा महामार्गावर ट्रॅव्हल्स बसला आग

**खेड- मुंबई-गोवा** महामार्गावर रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील कशेडी बोगद्याजवळ आज पहाटे मुंबईहून कोकणात जाणाऱ्या एका खासगी ट्रॅव्हल्स बसला अचानक आग लागली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. मालवणच्या दिशेने निघालेली लक्झरी बस मुंबईहून प्रवास करत असताना टायरचा मोठा आवाज झाला आणि लगेचच बसला आग लागली. ओमकार मागले व चालक सचिन लोके यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ बस थांबवली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले.

# मुंबई पोलीस आयुक्तालयातून प्लास्टिक बॉटल हद्दपार होणार

■ मुंबई

**मुंबई** पोलीस आयुक्तालयातून आता पाण्याची प्लास्टिक बॉटल हद्दपार होणार आहे. पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी पोलिसांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आयुक्तालयात अत्याधुनिक आरो प्लांट सुरू केला आहे. यापुढे आयुक्तालयात काचेच्या बाटल्यांमधून शुद्ध पाणी पुरवले जाणार आहे.

आरोग्याच्या दृष्टीने प्लास्टिकचा वापर धोकादायक आहे, याबाबत वेळोवेळी विविध माध्यमांतून इशारे दिले गेले आहेत. शिवाय बाटलीबंद पाणी किती दिवस टिकते आणि ते प्रत्यक्षात किती शुद्ध असते, याबाबत अनेकदा शंका व्यक्त होत असतात. या सर्व बाबींची गंभीर दखल घेत आयुक्त भारती यांनी हा निर्णय घेतला आहे. आयुक्तालयातील सर्व कर्मचाऱ्यांना शुद्ध पाणीच प्यायला मिळावे, आरोग्याच्या समस्या टाळाव्यात आणि प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर कमी व्हावा या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शुद्ध पाणी काचेच्या बाटल्यांमधून प्रत्येक विभागात पुरवले जात आहेत.






संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# सर्वाधिक नद्या, सर्वाधिक धरणं, तरी दुष्काळ

नुकताच राज्यभर धुवाधार पाऊस पडून गेला. राज्यातील ऐंशी टक्के धरणं साठ ते सत्तर टक्के भरल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. ज्या भागामध्ये नद्यांचे गाळे उत्तम स्वरूपाचे आहेत. आणि ज्या नद्यांवरची छोटी मोठी धरणं जर सत्तर टक्क्यांच्यावर भरली असतील तर त्या जिल्ह्यांची पाण्याची चिंता संपल्यात जमा आहे. मात्र राज्यातील असे अनेक जिल्हे आहेत की, तिथली धरणं पावसाळ्यात तुडुंब भरतात. परंतु उन्हाळ्यात त्या ठिकाणी हमखास पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. यावेळच्या पावसाने राज्याची पाणी चिंता मिटवली आहे. असे चित्र जरी आज दिसत असले तरी महाराष्ट्राच्या पन्नास टक्के भागातला दुष्काळ तसाच कायम राहतो. हीदेखील वस्तुस्थिती आहे. म्हणजे पाऊस तुडुंब बरसला असला तरी राज्याला दुष्काळाच्या चिंतेने अजूनही मुक्त केलेले नाही. जर अशी परिस्थिती असेल तर इतका प्रचंड पाऊस पडूनही राज्याला त्याचा अपेक्षेप्रमाणे उपयोग होत नाही असा त्याचा अर्थ निघतो. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यातील नद्यांच्या पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन अजूनही झालेले नाही. राज्याकडे एवढा मोठा जलसंपदा विभाग आहे. ज्याच्यावर दरवर्षी सरासरी सत्तर ते ऐंशी हजार कोटी रुपये खर्च होतात. जलसिंचनाच्या योजनांबरोबरच नद्यांमध्ये येणारे पाणी जे बऱ्याच वेळेला वाया जाते किंवा वाहून जाते. त्या त्या पाण्याला ठिकठिकाणी अडवण्याचे म्हणजेच छोट्या छोट्या बंधाऱ्यातून किंवा तलावातून हे पाणी साठवण्याचे प्रकल्प राबवले गेलेले नाहीत. जलयुक्तशिवारसारखी महत्त्वाकांक्षी योजना सरकारने हाती घेतली. परंतु त्या त्या भागातल्या तलावांमध्येसुद्धा पावसाचे पाणी साठवले जाईल, हे अनाठायी वाया जाणार नाही. अशा प्रकारची कोणतीही अभ्यासपूर्ण योजना जलसिंचन खात्याकडून राबवली गेलेली नाही. राज्याला छोट्या मोठ्या नद्यांचे बरेच मोठे वरदान लाभलेले आहे. दरवर्षी पावसाळ्यात सगळ्या नद्या दुथडी भरून वाहत असतात. परंतु पुढच्या महिना-दीड महिन्यामध्ये त्या कोरड्याठाकही होतात.

**हे एक आश्चर्यच.**

महाराष्ट्र हा भारतातील सर्वाधिक नद्या असलेला समृद्ध प्रदेश मानला जातो. एवढेच नव्हे तर एकूण भारतातल्या इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात सर्वाधिक धरणं सुद्धा आहेत. आज जवळपास २३०० धरणं महाराष्ट्रामध्ये आहेत आणि नद्यांची संख्या देखील दीडशेच्या वर जाते. सरकारकडे या नद्यांची अधिकृत संख्या उपलब्ध नाही. कारण त्यांच्या मताप्रमाणे महाराष्ट्रात भरपूर नद्या आणि उपनद्या आहेत. निश्चित आकडा सांगता येणे कठीण आहे. परंतु प्रमुख नद्यांची संख्या ही जवळपास ५० ते ६० च्या आसपास जाते. त्यामध्ये कृष्णा, गोदावरी, कोयना, तापी, नर्मदा यासारख्या नद्यांचा समावेश होतो. विशेषतः दोन सर्वात लांब असणाऱ्या नद्यांमध्ये गोदावरी आणि कृष्णेचा उल्लेख होतो आणि या नद्यांवर सर्वाधिक धरणंसुद्धा आहेत. म्हणजे भारतातील सर्वाधिक नद्या असलेले आणि भारतातील सर्वाधिक धरण असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य असूनही निम्मा महाराष्ट्र हा नेहमी दुष्काळग्रस्त असावा याच्याइतके दुसरे आश्चर्य नाही. याचा अर्थ असा की, नद्यांची विपुल संपत्ती उपलब्ध आहे. परंतु त्याच्या नियोजनामध्ये कुठेतरी मोठी त्रुटी असल्याचेच त्यातून सिद्ध होते. या नद्यांवर धरणे बांधली गेली आहेत. पण त्या धरणांच्या सिंचन क्षमतेबाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. अनेक नद्यांवरची धरणं ही जवळपास निष्क्रिय असल्याचेच म्हणावे लागते. केवळ त्या त्या ठिकाणच्या पुढाऱ्यांच्या आग्रहामुळे त्या भागात धरणं बांधली गेली. परंतु उन्हाळ्यामध्ये ही धरणंसुद्धा कोरडी पडतात. तिथे पाणी शिल्लक राहत नाही याचा अर्थ पावसाचं पाणी साठवून ठेवण्याबाबत किंवा पावसाचे पाणी या धरणांमध्ये येण्यासाठी काही स्वतंत्र योजनांची आवश्यकता आहे. मध्यंतरी सरकारने नदीजोड प्रकल्प हाती घेतले होते. जेणेकरून उपनद्यांना एकत्र आणून त्यांना मुख्य नद्यांशी जोडून आणि त्यावर आणखीन काही धरणं बांधून राज्याचे पाण्याची गरज भागवण्याचा विचार चालू होता. मध्यंतरी कोयना धरणाचे पाणी हे कोकणाकडे वळवण्याचा सुद्धा विचार झालेला होता. तसं पाहायला गेलं तर कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो आणि कोकणामध्ये सुद्धा प्रमुख मोठ्या नद्या आहेत. त्या नद्यांचे पाणीसुद्धा पावसाळ्यात वाहून जाते. पावसाळ्यातलं पाणी ठिकठिकाणी रोखून धरणे आणि त्याचा योग्य पद्धतीने वापर करणे किंवा त्याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे.

**अठरा हजार कोटींचे नवे प्रकल्प**

दुर्दैवाने या संदर्भात सरकारने अभ्यासपूर्ण असे कोणते निर्णय घेतलेले दिसत नाहीत. जी काही सिंचन क्षमता आहे ती महाराष्ट्राची केवळ १५ ते १८% आहे. म्हणजे सर्वाधिक धरणं असूनही १८% च जर सिंचन क्षमता असेल तर या इतक्या प्रचंड संख्येच्या धरणांचा नेमका काय उपयोग होतो असा प्रश्न उपस्थित होतो. भविष्यकाळामध्ये महाराष्ट्राची पाण्याची गरज भागवायची असेल तर या सगळ्या जलसिंचन योजनांचा पुनर्विचार किंवा पुन्हा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. ठिकठिकाणच्या नद्यांना एकत्रित करून किंवा त्या नद्यांमध्ये येणाऱ्या उपनद्यांचाही अभ्यास करून छोट्या छोट्या माध्यमाच्या बंधाऱ्यांचे बांधकाम व्हायला हवे. विशेषतः पावसाळ्यामध्ये हे पाणी कसे टिकून राहील याचा विचार करण्याची आता आवश्यकता निर्माण झालेली आहे. आता सुद्धा महाराष्ट्र सरकारने जवळपास चार मोठ्या धरणांसाठी १८००० कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी दिलेली आहे या नद्यांपैकी एक पश्चिम महाराष्ट्रात, एक विदर्भात, एक कोकणात आणि एक खांदेशातला प्रकल्प आहे. कोकणामध्ये नद्यांमधून मिळणारे पाणी त्या भागाची पाण्याची गरज भागवायला हवी. परंतु रायगड जिल्ह्यामध्ये जे धरण बांधले जाणार आहे, त्यात ३६ टक्के पाणी हे जवळजवळ मुंबईसाठी पुरवले जाणार आहे. मुंबईची गरज भागवण्यासाठी सुद्धा या धरणांचा उपयोग होणार आहे. त्याबरोबर ४६% पाणी हे नव्या मुंबईसाठी त्या धरणातून आणले जाणार आहे. खरे तर या धरणांची सुद्धा खूप आधीच योजना व्हायला हवी होती. परंतु सरकारी स्तरावर प्रचंड उदासीनता आणि प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याने नदीजोड प्रकल्प सुद्धा पूर्ण क्षमतेने आकाराला आलेले नाही आणि जलयुक्त शिवार योजनेच्या बाबतीतही सरकारकडून वेळोवेळी त्याचा आढावा घेतला जात नाही असेच म्हणण्याची वेळ येते.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**घरात दिवे असूनही निरांजनातून मिळणारा सात्विक प्रकाश हा आपल्याला अधिक प्रसन्न करणारा ठरतो.**

## पंचांग

**सोमवार, २५ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**भाद्रपद शुक्ल द्वितीया**
**नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी**



**रवी उदय- ०६-२३**
**रवी अस्त- १८-५८**

**-: जन्मराशी :-**
०० -०१ ते ०८-२८ **सिंह**
०८-२९ ते २४-०० **कन्या**

**मुस्लीम रबिलावल मासारंभ; वराह जयंती**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

# दुधी भोपळ्याचे आप्पे



★ **साहित्य -**
दुधी भोपळा - एक, उकडलेले बटाटे- दोन, धणे-एक चमचा, लाल मिरची - एक चमचा, गरम मसाला- एक चमचा, कोथिंबीर, मीठ- चवीनुसार, जिरेपूड- एक चमचा, ब्रेड स्लाईस -दोन काप, तेल

★ **कृती-**
सर्वात आधी दुधी सोलून किसून घ्यावा लागेल. आता दुधीचा सर्व रस काढावा. मग त्यात बटाटे मॅश करावे. यानंतर लाल मिरची, जिरेपूड, गरम मसाला, धणे, कोथिंबीर, चवीनुसार मीठ असे आवश्यक मसाले मिसळावे. यात ब्रेड ओला करून मिक्स करावे. नंतर आप्पेचे छोटे गोळे बनवावे. यानंतर, आप्पे पॅनमध्ये तेल ग्रीस करावे. मग हे गोळे आप्पे पॅनमध्ये ठेवावे आणि मंद आचेवर शिजवावे. तर चला तयार आहे रविवार स्पेशल नाश्ता दुधी भोपळ्याचे आप्पे रेसिपी. सॉस किंवा हिरव्या चटणीसोबत नक्कीच सर्व्ह करा.



# चेतेश्वर पुजाराची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

## ७,१९५ धावांसह १९ शतके आणि ३५ अर्धशतके



**फलंदाज चेतेश्वर पुजाराने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याने आपल्या कार्दीतो जून २०२३ मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. २०१० मध्ये त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध बंगळुरूमध्ये कसोटीत पदार्पण केले. कसोटी क्रिकेटमध्ये पुजाराने १०३ सामन्यांच्या १७६ डावांत ४३.६० च्या सरासरीने ७,१९५ धावा केल्या. या दरम्यान त्याने १९ शतके आणि ३५ अर्धशतके केली.**

■ गांधीनगर

**त्याची** सर्वोत्तम धावसंख्या नाबाद २०६ धावा असून त्याने ५ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले, ज्यामध्ये त्याने १०.२० च्या सरासरीने एकूण ५१ धावा केल्या. तो भारतासाठी एकही टी-२० आंतरराष्ट्रीय खेळू शकला नाही. भारतीय संघ परदेशात खेळताना जेव्हा जेव्हा अडचणीत असायची तेव्हा पुजारा एक बाजू शेवटपर्यंत धरून ठेवायचा. कासवगतीने धावा करणे आणि गोलंदाजांना घाम फोडणे हे त्याला चांगले जमायचे. २०१८-१९ आणि २०२०-२१ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारतीय संघाला विजय मिळवून देण्यात त्याने अतिशय महत्वाची भूमिका बजावली होती. २०२०-२१ दौऱ्यावर गाबा कसोटी सामना भारतीय संघाच्या हातून निसटला होता. या कसोटीत त्याला ऑस्ट्रेलियाचे गोलंदाज बाऊंसरवर बाऊंसर मारत होते. पुजाराने हे सर्व चेंडू स्वतःच्या अंगाला मारून घेतले. हात, पाय, छाती आणि हेल्मेट अशी एकही जागा शिल्लक उरली नव्हती, जिथे पुजाराला चेंडू लागला नसेल. मात्र, तरीही त्याने मैदान सोडले नव्हते. तो पंतसोबत उभा राहिला आणि भारतीय संघाला सामना जिंकून दिला होता. भारतीय फलंदाज आधी हा सामना वाचवण्याच्या प्रयत्नात होते. त्यामुळे पुजारावर विकेट न टाकता शेवटपर्यंत किल्ला लढवण्याची जबाबदारी होती. पुजाराने या डावात २११ चेंडूंचा सामना केला आणि ५६ धावा केल्या होत्या. पुजारामुळे ऑस्ट्रेलियाचे गोलंदाज थकले होते. याचा ऋषभ पंतने चांगला फायदा घेतला आणि भारतीय संघासाठी विजय खेचून आणला.

# विश्वचषकासाठी विशारवापट्टणममध्ये भारतीय महिला संघाचे शिबिर होणार

■ विशारवापट्टणम

**भारतीय** महिला संघाच्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीसाठी विशाखापट्टणम येथे एक प्रशिक्षण शिबिर आयोजित केले जाईल. भारत त्याच मैदानावर दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध विश्वचषकाच्या साखळी सामने देखील खेळेल. शिबिर २५ ऑगस्टपासून सुरू होईल आणि खेळाडूंना एक दिवस आधी रिपोर्ट करण्यास सांगण्यात आले आहे.

१५ सदस्यीय विश्वचषक संघाव्यतिरिक्त ६ स्टँडबाय खेळाडूंचाही या शिबिरात समावेश केला जाईल. यामध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय संघात निवड झालेल्या सायली सातघरेचा समावेश आहे, परंतु अष्टपैलू अमनजोत कौर विश्वचषकात तिच्या जागी परतेल. भारत-अ संघही सामील होऊ शकतो या शिबिरात भारत-अ संघाचाही समावेश करता येईल. संघ सध्या ऑस्ट्रेलिया-अ विरुद्ध एक अनधिकृत चाचणी खेळत आहे. भारत-अ संघ आपला पहिला सराव सामना न्यूझीलंड विरुद्ध बेंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स येथे खेळेल. श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिका हे संघ सह-यजमान शहर कोलंबोमध्ये राहतील आणि तेथे त्यांचे सराव सामने खेळतील.

# बीओबी कॅरम स्पर्धेमध्ये अन्सारी, इंदिरा राणे विजेते

■ मुंबई

**बँक** ऑफ बडोदा-बीओबी मुंबई विभागीय निवड चाचणी कॅरम स्पर्धेमध्ये पुरुष गटात आजर अन्सारी आणि महिला गटात इंदिरा राणे विजेते ठरले. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने झालेल्या पुरुष एकेरी कॅरम स्पर्धेत मोक्याच्या क्षणी अचूक फटके साधत अन्सारीने गतविजेत्या विकास महाडिकला ५-१ असे नमविले आणि विजेतेपदाला गवसणी घातली. बँक ऑफ बडोदा-मुंबई क्रीडा विभागाचे प्रदीप सुरोशे व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी विजेते-उपविजेत्यांचे अभिनंदन केले.

तत्पूर्वी झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात प्रथम मानांकित विकास महाडिकने जितेंद्र मिठबावकरचा १६-१ असा तर आजर अन्सारीने हेमंत शेलारचा १६-६ असा पराभव केला. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात इंदिरा राणेने ज्योती श्रीमळला १७-८ असे हरवून अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केला.

# पिंच्याक सिलॅट स्पर्धेमध्ये पनवेलच्या खेळाडूंचे यश

■ मुंबई

**महाराष्ट्र** पिंच्याक सिलॅट असोसिएशनने कोपरखैरणे येथे आयोजित केलेल्या १५ व्या पिंच्याक सिलॅट राज्यस्तरीय स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंनी ११ पदके जिंकुन शानदार कामगिरी केली. या स्पर्धेमध्ये २६ जिल्ह्यांतील ४८५ खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धा प्री-टेन, सब ज्युनिअर, ज्युनिअर वयोगटातील मुला, मुलींसाठी होत्या. पनवेलच्या खेळाडूंनी ४ सुवर्ण, ४ रौप्य, ३ कांस्य पदकांची कमाई केली.





खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक योगेश बैकर, विरेश राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. पदक विजेते खेळाडू कर्नाटक, हुबळी येथे पुढील महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतील. विजेत्या खेळाडूंचे पिंच्याक सिलॅट असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष किशोर येवले आणि पिंच्याक सिलॅट असोसिएशन ऑफ पनवेलचे चेअरमन मंदार पनवेलकर यांनी खास अभिनंदन केले आहे.

**पदक विजेते**

**सुवर्णपदक -** तनिष्का मिश्रा, अर्चित जाधव, भावेश पाटील, ध्रुव सिंह
**रौप्यपदक -** स्वयम राम, शौर्य वर्धन दांडी, चैतन्य काकडे, आयुषी शिंदे
**कांस्यपदक -** दर्शित माळी, स्वर्न भोईर, सानिया शेरव.

# ऑस्ट्रेलियाचा द.आफ्रिकेवर विजय

■ मॅके

**ऑस्ट्रेलिया** संघाने आज द.आफ्रिकेविरुद्ध्या तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात सलामीवीर ट्रॅव्हिस हेड, कर्णधार मिचेल मार्श आणि कॅमेरॉन ग्रीन यांच्या शानदार शतकी खेळींच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने निर्धारित ५० षटकांत केवळ २ गडी गमावून ४३१ धावा केल्या. या प्रत्युत्तरात द. आफ्रिकेला २४.५ षटकांत सर्वबाद १५५ धावा करण्यात यश आले. मात्र या सामन्याच्या आधीच द. आफ्रिकेने मालिकेत विजयी आघाडी घेतली होती.

ट्रॅव्हिस हेड आणि कर्णधार मिचेल मार्श यांनी ३४.१ षटकांत २५० धावांची विक्रमी भागीदारी रचली. हेडने १०३ चेंडूंत १४२ धावांची तुफानी खेळी केली. त्यानंतर, मिचेल मार्श १०६ चेंडूंत १०० धावांवर बाद झाला. त्यावेळी ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ३६.३ षटकांत २ बाद २६७ अशी होती. यानंतर कॅमेरॉन ग्रीनने केवळ ५५ चेंडूंत नाबाद ११८ धावांची स्फोटक खेळी केली.

# आजपासून वर्ल्ड बॅडमिंटन स्पर्धेला सुरुवात
## सिंधू आणि लक्ष्य सेनसमोर मोठे आव्हान

■ पॅरिस

**दोन** वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधू आणि स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन यांना सोमवारपासून वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कठीण आव्हानाचा सामना करावा लागणार आहे. सिंधू आणि लक्ष्य त्यांच्या खराब कामगिरीतून सावरून फॉर्ममध्ये परतण्याच्या उद्देशाने या स्पर्धेमध्ये प्रवेश करतील. एका वर्षापूर्वी ऑलिम्पिकमध्ये चौथे स्थान मिळवणारा सेन चांगल्या कामगिरीच्या आशेने फ्रान्सच्या राजधानीत परतणार आहे.

लक्ष्यला वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये प्रवेश करायचा असेल तर त्याला त्याचे सर्वोत्तम प्रदर्शन करावे लागेल. तो अनेकदा ली शी फेंग, कोडाई नारोका आणि शी यांच्याविरुद्धच्या कठीण सामन्यांमध्ये अपयशी ठरला आहे.

# आशिया क्रिकेट चषकासाठी अफगाणिस्तानचा संघ जाहीर

■ काबुल

**येत्या** ९ सप्टेंबरपासून सुरू होणार्या आशिया क्रिकेट चषकासाठी अफगाणिस्तानचा संघ जाहीर झाला. संघाच्या नेतृत्वाची धुरा अनुभवी खेळाडू राशिद खानकडे सोपवण्यात आली. तर अजमतुल्लाह उमरजई आणि मोहम्मद नबीसारख्या अनुभवी खेळाडूंना देखील या संघात स्थान देण्यात आले आहे. या संघात प्रमुख फलंदाज म्हणून इब्राहीम जादरान आणि रहमनुल्लाह गुरबाज यांना संधी देण्यात आली. या दोघांची गेल्या काही सामन्यातील कामगिरी पाहता या जोडीकडे डावाची सुरूवात करण्याची जबाबदारी दिली जाऊ शकते. या संघात सर्वात अनुभवी खेळाडू मोहम्मद नबीचा देखील समावेश करण्यात आला आहे. गोलंदाज म्हणून नवीन उल हकला संघात स्थान देण्यात आले आहे. नवीन उल हकने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दमदार गोलंदाजी केली आहे. त्याच्या नावे ६७ गडी बाद करण्याची नोंद आहे. यासह फजलहक फारूकीचा देखील संघात समावेश करण्यात आला. तर फिरक गोलंदाज म्हणून या संघात कर्णधार राशिद खानसह नूर अहमद आणि अल्लाह गजनफर यांना देखील संधी देण्यात आली आहे. अफगाणिस्तानचा पहिला सामना ९ सप्टेंबरला हाँगकाँग संघाविरूद्ध होणार आहे.





**अफगाणिस्तानचा संघ**

**रहमानुल्लाह गुरबाज, राशिद रवान (कर्णधार) , इब्राहीम जादरान, दरविश रसूली, सेदिकुल्लाह अटल, अजमतुल्लाह उमरजई, करीम जनत, मोहम्मद नबी,मोहम्मद इशाक, मुजीब उर रहमान, गुलबदीन नईब, शराफुद्दीन अशरफ, अल्लाह गजनफर, नूर अहमद, फरीद मलिक, नवीन उल हक, फजलहक फारुकी**

# ‘मारीसन’

## परीक्षण

## प्रेक्षकांना हसायला भाग पाडेल

**तमिळ चित्रपटांचे विनोदवीर म्हणून लोकप्रिय असलेले ज्येष्ठ अभिनेता वडिवेलू आणि आपल्या दमदार अभिनयाने सध्या चर्चित असलेले अभिनेता फहाद फाजिल यांनी मॉरीसन या सिनेमामध्ये पुन्हा एकदा एकत्र काम केले आहे. यापूर्वी हे दोघे ‘मामन्नन’ या सिनेमामध्ये एकत्र दिसले होते. दिग्दर्शक सुधीश शंकर यांचा ‘मारीसन’ हा एक कॉमेडी थ्रिलर चित्रपट आहे. असा विषय - जॉनर जो खूप चांगला दिसतो किंवा अजिबात आवडत नाही.**

### चित्रपटाचे कथानक

कथा दयालन नावाच्या लहान सहान चोराची आहे, जो नुकताच पलायमकोट्टई जेलमधून सुटून आला आहे. त्याच्यामते काही घरं त्याच्याशी बोलतात, त्याला बोलवत असतात जेणेकरून तो त्या घरांमध्ये लूटमार करू शकेल. जेलमधून बाहेर येताच तो वेलायुधम पिल्लेच्या घराकडे ओढला जातो. चोरी करण्यासाठी तो जेव्हा घरामध्ये घुसतो, त्याला दिसते की वेलायुधम आपल्या पलंगावर साखळ्यांनी बांधलेला आहे. वेलायुधम दयालनला सांगतो की, त्याला अल्झायमर (स्मृतिभ्रंश) आहे. तो दयालनला विनंती करतो की, त्याला तिरुवन्नामलाईला आपल्या मित्राच्या घरी सोडावे. रस्त्यात एक एटीएम स्टॉप येतो, तेव्हा दयालनला वेलायुधमसह राहाण्याचे एक मोठे कारण मिळते कारण त्याला कळते की वेलायुधमच्या खात्यात २५ लाख रुपये आहेत. त्यानंतर दयालन त्याच्याशी चांगले वर्तन करू लागतो. वेलायुधचा प्रत्येक हट्ट पुरवण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून तो एटीएमचे पासवर्ड - पिन नंबर त्याला सांगेल. यानंतर तो त्याला तिरुवन्नामलाईला सोडण्याचे नाटक करतो, पण त्याचा मूळ उद्देश वेलायुधच्या पैशांपर्यंत पोहचण्याचाच असला तरी दोघांमध्ये सहानुभूती, धूर्तपणा, धोका आणि भावनांचा प्रवास देखील आहे.

### कसा आहे सिनेमा ?

मारीसन या मूळ अरबी शब्दाचा अर्थ यशस्वी होणे. त्यामुळे हे शीर्षक चित्रपटाच्या पटकथेला शोभते. सुरुवातीला चित्रपटामध्ये साप आणि उंदीर यांचा विचित्र असा व्हीएफएक्स सीन दिसतो. पहिल्यांदा प्रेक्षकांना तो उगाचच दाखवला आहे असे वाटते, परंतु नंतर लक्षात येते की तो सीन चित्रपटाचा आत्मा आहे. वेगवेगळ्या विचारांची दोन व्यक्ती आहेत; त्यातील एक अल्झायमरमुळे त्रस्त आहे, परंतु त्याला आपल्या आयुष्यातील एक मिशन पूर्ण करायची इच्छा आहे. तर दुसरा चोर आहे जो त्या अल्झायमर पेशंटला लुटायचा विचार करत आहे. चित्रपटामध्ये असे अनेक छान प्रसंग आहेत जे प्रेक्षकांची मने जिंकण्यात यशस्वी झाले आहेत. उदाहरणार्थ वेलायुधमचा निरागस हट्ट किंवा दयालनचा निरागस चलाखपणा. दोघेजण कधी तमिळ चित्रपटांची गाणी गातात, तर कधी कमल हासनवर विनोद करतात. परंतु मध्यांतर येईपर्यंत कथा थ्रिलरमध्ये बदलत जाते. सिनेमाचा पहिला भाग उत्तम बनला आहे. मात्र मध्यांतरानंतचा काहीसा भाग रटाळ वाटतो. सुधीश शंकर यांचे दिग्दर्शन कथा-पटकथेला अनुसरुन आहे. तांत्रिकदृष्ट्या चित्रपट चांगला बनला आहे. कलईसेल्वन शिवाजी यांचा कॅमेरा तामिळनाडूच्या ग्रामीण भागातील मनोहारी दृश्ये दाखवतो. युवान शंकर राजा यांचे पार्श्वसंगीत पटकथेला उत्तम साथ देते. इलायाराजा यांच्या नेथु ओरुथारा ओरुथारा पाथोम या एका लोकप्रिय गाण्याचे रिमिक्स केवळ संगीताच्या दृष्टिकोनाने नव्हे, तर पटकथेला पूढे न्यायला मदत करते. चित्रपटाचा १५४ मिनिटांचा कालावधी थोडा अधिक वाटतो, खासकरून दुसरा भाग लांब वाटतो. सिनेमाचा क्लायमॅक्स मात्र फारसा प्रभावी बनलेला नाही. ७० व ८० च्या दशकातील सिनेमांमध्ये शोभावा असा क्लायमॅक्स बनला आहे. असे असले तरी हा एक कॉमेडी थ्रिलर चित्रपट आहे,जो प्रेक्षकांना हसायला भाग पाडतो. एक ठोस कथा, दमदार अभिनय आणि अनेक मजेदार प्रसंग यांनी नटलेला हा सिनेमा प्रेक्षकांना नक्कीच आनंद देतो.




**चित्रपट : - मारीसन’**
**दिग्दर्शक: सुधीश शंकर**
**कलाकार: वडिवेलू ,फहाद फासिल, विवेक प्रसन्ना व अन्य**
**ओटीटी प्लॅटफॉर्म: नेटफ्लिक्स**
**रेटिंग: ३/५**



### अभिनय

अभिनेता वडिवेलू हे या चित्रपटाचा आत्मा आहेत. त्यांच्या अभिनयाची ताकद इतकी आहे की, एखाद्या सीनमध्ये त्यांना उदास , दु:खी पाहिले की, प्रेक्षकांच्या डोळ्यात अश्रू येतात आणि एका विनोदी कलाकाराने प्रेक्षकांना रडवणे ही सोपी गोष्ट नाही. फहाद फासिलनी आपल्या व्यक्तिरेखेमध्ये समरस होऊन काम केले आहे. विवेक प्रसन्ना या कलाकाराने देखील चांगले काम केले आहे. अन्य सहाय्यक कलाकारांचा अभिनय ठीकठाक. या सिनेमातील फ्लॅशबॅक, पटकथा लेखन, अनेक प्रसंग यांचा विचार केला तर 'मारीसन' तुम्हाला नक्कीच आवडेल.

# ही कल्पनाच मला सहन होत नाही...



गेल्या अनेक काळापासून अभिनेत्री श्रद्धा कपूरचे नाव व्यावसायिक राहुल मोदीसह जोडले गेले आहे. अनेकदा दोघांचे एकत्र व्हिडिओ आणि फोटो देखील व्हायरल झाले आहेत. परंतु अद्याप त्यांच्या या नात्यावर श्रद्धा किंवा राहुलने कोणतेही वक्तव्य केलेले नाही. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये श्रद्धाला लिव्ह-इन रिलेशनशिपबद्दल प्रश्न विचारला असता, श्रद्धाने स्पष्ट शब्दांमध्ये सांगितले की, माझ्या मते लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणे योग्य नाही. मला माझ्या आईवडिलांसह राहणे खूप आवडते. आईवडिलांचे घर सोडून दुसऱ्या कुठल्या घरात राहणे किंवा इतर कोणत्या व्यक्तीसोबत राहणे, ही कल्पनाच मला सहन होत नाही. माझ्याकडून तसे होणे अशक्य आहे. श्रद्धाच्या अभिनय कारकिर्दीविषयी सांगायचे तर, काही काळापूर्वीच ती स्त्री २ मध्ये दिसली होती. सध्या श्रद्धा आपल्या चित्रपटांच्या निवडीबाबत अधिक चोखंदळ झाली आहे.

## गणेशोत्सवानिमित्ताने मुक्ता, स्पृहा आणि वंदना गुप्ते...



श्री गणेशोत्सवाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी मनोरंजनाचे कार्यक्रम होत असतात. यावर्षी ‘ब्राह्मण सेवा मंडळा’च्या शतकमहोत्सवी गणेशोत्सवाचे औचित्य साधत असेच काही घवघवीत, दमदार, रंजक कार्यक्रम सादर केले जाणार असून त्यामध्ये अभिनेत्री मुक्ता बर्वे, अभिनेत्री स्पृहा जोशी आणि जेष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते सहभागी होणार आहेत. २९ ऑगस्ट रोजी रात्री ‘प्रिय भाई एक कविता हवी आहे’ हा पु.ल. देशपांडे आणि सुनीताबाई यांच्याशी जोडलेला कविता-प्रेमातून उलगडणारा संवाद आणि शोध टिपण असा अत्यंत वेगळा काव्यमय नाट्यप्रयोग अभिनेत्री मुक्ता बर्वे अत्यंत मुलायम आणि प्रभावी अभिनयाद्वारे सादर करणार आहेत तर १ सप्टेंबर रोजी अभिनेता संकर्षण कऱ्हाडे आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांची जोडी ‘संकर्षण via स्पृहा’ हा मराठी साहित्य-मनोरंजनाचा कार्यक्रम सादर करणार आहे. पद्मश्री माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या सुमधुर गीतांवर आधारित ‘हसले मनी चांदणे’ हा कार्यक्रम ३ सप्टेंबर रोजी सादर होणार असून त्यात माणिक वर्मा यांच्या कन्या वंदना गुप्ते आणि राणी वर्मा उपस्थित राहणार आहेत. हे सर्व कार्यक्रम रात्री ८ वाजता दादर पश्चिम येथील ब्राह्मण सेवा मंडळ, भवानी शंकर रोड येथे सादर होणार असून रसिकांना विनामूल्य पाहता येतील.

## कोण आहे श्रीमंत अनशूर ?



कालपासून बिग बॉस चा १९ वा सीझन सुरू झाला आहे. यामध्ये अनेक सेलिब्रिटीज दिसत असल्या तरी सध्या चर्चा सुरू आहे ती २१ वर्षीय अनशूर कौरची. तिने टीव्ही आणि सिनेमाक्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे, परंतु इतक्या लहान वयामध्ये तिने खूप माया जमवली आहे. कोण आहे ही अनशूर? पाच वर्षांची असताना अनशूरने टीव्ही जगतात पदार्पण केले होते. झांसी की रानी, साथ निभाना साथिया, देवों के देव महादेव आणि ये रिश्ता क्या कहलाता अशा अनेक मालिकांमध्ये तिने काम केले आहे. त्याचप्रमाणे संजू आणि मनमर्जियां या सिनेमांमध्ये देखील ती दिसली होती. महाविद्यालयीन पदवी मिळवलेल्या अनशूर सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर असून तिचे ९ मिलियन फॉलोअर्स आहेत.

हेल्दी Me

# एअर कंडिशनरचे डोळ्यांवरील दुष्परिणाम

***ब**दलत्या काळात एअर कंडिशनर हा अनेक जणांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. अनेक लोक घरात किंवा ऑफिसमध्ये बरेच तास वातानुकूलित (एसी) खोलीत राहतात. परंतु डोळ्यांवर त्याचे दुष्परिणाम हळूहळू जाणवू लागतात. ते समजून घेणे गरजेचे आहे.*



**डोळे कोरडे पडणे** : एसीमध्ये सतत बसल्यामुळे कोरड्या डोळ्यांची समस्या अधिक तीव्र होऊ शकते. बंद खोलीत एसी चालू असताना त्यामधून धूळ, परागकण, बुरशी यांसारखे घटक हवेत पसरतात. यामुळे डोळ्यांच्या आसपास खाज, पुरळ किंवा ॲलर्जी होण्याचा धोका वाढतो. विशेषतः ज्यांना आधीपासूनच डोळ्यांची कोरडेपणाची तक्रार आहे किंवा जे काँटॅक्ट लेन्स वापरतात, त्यांच्यासाठी ही स्थिती अधिक गंभीर ठरते. दीर्घकालीन कोरडेपणा कॉर्नियाचे नुकसान करू शकतो.

2 **दृष्टी धूसर होणे** : डोळ्यांतील स्नेहक घटक कमी झाल्यामुळे डोळ्यांचा पृष्ठभाग सुरळीत राहत नाही. यामुळे ब्लर व्हिजन म्हणजेच धूसर दिसणे हे लक्षण दिसू शकते. सतत एसीत बसल्यामुळे ही समस्या वाढू शकते.

3 **नैसर्गिक ओलावा कमी होणे** : एसी शरीरातून घाम आणि उष्णता कमी करत असतो, पण त्याचबरोबर डोळ्यांसह त्वचा, घसा, नाक यांतील नैसर्गिक ओलावाही कमी करतो. डोळ्यांतील श्लेष्मल त्वचेला या कोरडेपणाचा फटका बसतो. त्यामुळे डोळ्यांची बॅक्टेरिया व विषाणूंविरुद्ध लढण्याची क्षमता कमी होते. याचा परिणाम म्हणून डोळे चुरचुरणे, लालसरपणा किंवा सौम्य वेदनाही होऊ शकते.



4 **डोळ्यांमध्ये संसर्गाचा धोका वाढणे**
डोळ्यातील अश्रूंच्या थरात जेव्हा ओलावा कमी होतो, तेव्हा तो थर संक्रमणापासून संरक्षण करण्यास कमी प्रभावी ठरतो. यामुळे डोळ्यांच्या संसर्गाचा धोका वाढतो. एसीमध्ये बसल्यामुळे डिहायड्रेशन, थकवा, त्वचा कोरडी होणे, डोकेदुखी, श्वसनाचे त्रास, ॲलर्जी व दम्यासारख्या तक्रारी देखील वाढू शकतात. जर एसीची सफाई योग्य वेळेत नसेल, तर त्यातून सूक्ष्म बुरशी व इतर घातक कण हवेत मिसळतात आणि श्वसनाचे व डोळ्यांचे आजार होऊ शकतात.


5 **लक्षणांकडे दुर्लक्ष नको!**
डोळे चुरचुरणे, कोरडेपणा यावर स्नेहक (lubA°icating) डोळ्यांचे थेंब उपयोगी ठरू शकतात. मात्र, जर सतत डोळ्यांत वेदना, धूसर दृष्टी, प्रकाशाची भीती किंवा तीव्र खाज असेल, तर नेत्रतज्ज्ञांचा सल्ला तातडीने घ्या. स्वतःहून औषधं घेणं धोकादायक ठरू शकतं. कारण त्याने मूळ आजार दुर्लक्षिला जाऊ शकतो. तथापि, कालांतराने अधिक गंभीर स्वरुपात ही समस्या समोर येऊ शकते.

- ☑ दर २० मिनिटांनी, २० सेकंदांसाठी २० फूट दूर पहा. यामुळे डोळ्यांवरील ताण कमी होतो.
- ☑ बाहेर गेल्यावर धूळ किंवा प्रदूषण असल्यास डोळ्यांना संरक्षण देण्यासाठी चष्मा वापरणं उपयुक्त ठरतं.
- ☑ विशेषतः एसी सतत चालू असलेल्या खोलीत ह्युमिडिफायर वापरल्यास हवेत ओलावा टिकवून ठेवता येतो.
- ☑ भरपूर पाणी प्या, आहारात डोळ्यांसाठी फायदेशीर व्हिटॅमिन-ए युक्त पदार्थ (जसे गाजर, पालक, टोमॅटो) घ्या. स्क्रीन वापरताना नियमित डोळ्यांची उघडझाप करा.
- ☑ जर एसी किंवा स्क्रीन वापर कमी करणं शक्य नसेल, तर डॉक्टरांच्या सल्ल्याने प्रिझर्वेटिव्ह-फ्री आयड्रॉप्स वापरा.
- ☑ डोळ्यांची नियमित तपासणी केल्यास सुरुवातीच्या टप्प्यातच ड्राय आय सिंड्रोम ओळखता येतो आणि गंभीर नुकसान टाळता येते.

## हेल्दी टिप्स



लवंगाचा वापर अनेक वर्षांपासून दातदुखीवरील उपाय म्हणून केला जातो. यासाठी दुखणाऱ्या दातांमध्ये वा दाढेमध्ये एक लवंग दाबून धरावी. असे केल्याने लवंगेतून रस बाहेर निघतो व दात बधीर होतो. त्यामुळे दातदुखी थांबते. या प्रयोगाला जास्त वेळ लागतो. कारण लवंग कडक असते व नरम होण्यासाठी वेळ लागतो. लवंगाचे तेल देखील आपण यासाठी वापरू शकता. लवंगाचा तेलामध्ये कापसाचा बोळा बुडवून दुखऱ्या दातावर दाबून धरले असता दुखायचा थांबतो.



लहान बालकांमध्ये होणारा डांग्या खोकला ज्याला हुपिंग कफ म्हटले जाते, या आजारामध्ये लसणाच्या दोन-तीन पाकळ्या ठेचून त्यांच्या रसात ऑलिव्ह ऑईल मिसळून त्या तेलाने लहान मुलांच्या छातीला व पाठीला मालिश करावी. यामुळे लहान मुलांमधील डांग्या खोकला बरा होतो.

# मधुमेहींसाठी वरदान ॲल्युलोज

मधुमेह हा जीवनशैलीशी संबंधित आजार असला तरी साखर खाणे टाळणे हे या आजाराविरुद्धच्या लढाईत आवश्यक असते. परंतु गोड पदार्थ वर्ज्य करणे म्हणजे आयुष्यातील गोडवाच निघून जाणे आहे, असे म्हणत मधुमेही साखरेला पर्याय असणारे घटक वापरत असतात. सध्याच्या काळात यासाठी स्टीव्हिया, ट्रुव्हिया, मॉंक फ्रूट, कोकोनट शुगर, डेट शुगर असे काही पर्याय लोकप्रिय आहेत. हे सर्व पर्याय काही प्रमाणात आरोग्यास अनुकूल मानले जात असले, तरीही यामध्ये कमी प्रमाणात का होईना, पण ग्लुकोज आणि इन्सुलिन वाढवण्याची क्षमता असते. यामुळे मधुमेह आणि लठ्ठपणाच्या धोक्यांपासून पूर्णतः मुक्ती मिळत नाही.

मात्र, आता कार्डिओलॉजिस्ट आणि फंक्शनल मेडिसिन तज्ज्ञ डॉ. आलोक चोप्रा यांनी एक नवीन पर्याय सुचवला आहे. याचे नाव आहे ॲल्युलोज. हा एक दुर्मीळ साखर पर्याय असून तो केवळ इन्सुलिन स्तर वाढवत नाही तर चरबीही कमी करतो आणि ऊर्जा वाढवतो.

### ॲल्युलोज म्हणजे काय?

ॲल्युलोज ही एक कमी कॅलरीची नैसर्गिक साखर आहे, जी स्वादाने साखरेपेक्षा थोडी कमी गोड असते. महत्त्वाचं म्हणजे, ती ब्लड शुगर किंवा इन्सुलिन वाढवत नाही. डॉ. चोप्रा यांच्या मते, ॲल्युलोजचा ७० टक्के भाग शरीरात शोषला जातो आणि लघवीतून बाहेर टाकला जातो. त्यामुळे ती उर्जामध्ये रूपांतरित होत नाही आणि साखरेसारखा दुष्परिणाम करत नाही.



### ॲल्युलोजचे आरोग्यदायी फायदे

- **कमी कॅलरी** : फक्त ०.२ ते ०.४ कॅलरी प्रति ग्रॅम. म्हणजे साखरेच्या तुलनेत १/१०व्या कॅलरी
- **यकृत, मूत्रपिंड यांसाठी सुरक्षित** : यकृत, मूत्रपिंड आणि चरबीच्या ऊतींवर कोणताही ताण देत नाही. शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस आणि दाहक प्रक्रिया कमी करते
- **ब्लड शुगर नियंत्रणात ठेवते** : ॲल्युलोजचा ग्लायसेमिक इंडेक्स फारच कमी असल्याने अन्नानंतर होणाऱ्या रक्तातील साखरेच्या वाढीवर नियंत्रण राहते. इन्सुलिन सेन्सिटिव्हिटी सुधारते
- ऊर्जा वाढवते. माइटोकॉन्ड्रिया कार्यक्षमता वाढवते. थकवा कमी होतो आणि शरीराला ऊर्जा मिळते. डायबेटिक नेफ्रोपथीपासून संरक्षण देते. चरबी कमी होण्याबरोबरच भूक नियंत्रणात राहते. सेवनानंतर पोट भरल्याचा अनुभव वाढवते.

### ॲल्युलोजचे नैसर्गिक स्रोत कोणते?

गहू, अंजीर, मनुका, गूळ, मेपल सिरप, फणस, कीवी आणि कॉफी यामध्ये ॲल्युलोज काही प्रमाणात नैसर्गिक स्वरूपात आढळते. डॉ. चोप्रा स्पष्टपणे सांगतात की, इतर साखर पर्यायांमध्ये अनेकदा कृत्रिम गोडीसाठी काही घटक वापरले जातात. उदाहरणार्थ स्टीव्हिया / ट्रुव्हिया अनेकदा कृत्रिम घटकांशी मिसळलेली असते. डेट किंवा कोकोनट शुगर नैसर्गिक असली तरी त्यांचा ग्लायसेमिक इम्पॅक्ट अधिक असतो. ॲल्युलोज मात्र त्याच्या नैसर्गिक रचनेमुळे शरीरासाठी अधिक अनुकूल आहे. नॅशनल लॅबोरेटरी ऑफ मेडीसीनमध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार प्रत्येक जेवणात ५ ते १० ग्रॅम ॲल्युलोजचे सेवन केल्यास पोस्टप्रँडियल ब्लड ग्लुकोज लेव्हल (भोजनानंतर रक्तातील साखर) कमी होते. अर्थात, याचा वापरही मर्यादित प्रमाणातच करावा.

**(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)**



## नवं काही


# मेंदू आणि मज्जासंस्थेसाठीही प्रथिने गरजेची

न्युरोसर्जन डॉ. स्टीवन स्पिट्झ यांनी मध्यंतरी त्यांच्या इंस्टाग्रामवर एक पोस्ट अपलोड करून मेंदू आणि मणक्याच्या आरोग्यासाठी प्रथिनांची गरज का असते यावर प्रकाश टाकला होता. त्यानुसार, न्युरॉन्सचा संवाद व त्यांच्या तंदुरुस्ती प्रोटीनवर अवलंबून असते.
प्रथिनांमध्ये असलेले ॲमिनो ॲसिड्स हे मेंदूतील डोपामिन व सेरोटोनिनसारखे न्यूरोट्रांसमीटर बनवण्यासाठी गरजेचे असतात. स्मरणशक्ती व मेंदूचे एन्झाईम्स हेही प्रोटीनवर आधारित असतात. त्यामुळे फक्त फॅट्स पुरेसे नाहीत, तर मेंदूचे कार्य सुरळितपणे चालण्यासाठी प्रोटीनसुद्धा आवश्यक आहेत.

आपल्या मणक्याचे हाडं, डिस्क्स आणि संयोजी ऊतकं (connective tissues) हे सर्व कोलेजन नावाच्या प्रोटीनपासून बनलेले असतात. काही वेळा अपघाताने मणक्याची शस्त्रक्रिया करण्याची गरज येते. अशावेळी सर्जरीनंतर बरे होण्यासाठी प्रोटीन आवश्यक आहे. शरीरातील ऊती, स्नायू, आणि मेंदू पुन्हा व्यवस्थित होण्यासाठी प्रोटीनची भूमिका महत्त्वाची आहे. जखम आणि सूज कमी करण्यासाठीही प्रोटीन आवश्यक आहे. त्यामुळे ऑपरेशननंतरच्या काळात बरे होण्याची प्रक्रिया वेगवान होते.

सार्कोपेनिया (वृद्धापकाळातील स्नायूंची झीज) टाळण्यासाठी प्रोटीनचे नियमित सेवन आवश्यक आहे. स्नायू कमजोर झाले की पाठदुखी, सांधेदुखी सुरू होतात आणि याचं मूळ बहुतेक वेळा कमी प्रोटीन सेवन असतं. प्रोटीनमुळे स्नायूंची दुरुस्ती, समतोल राखणे आणि ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे दरदिवशी पुरेसं प्रोटीन मिळणं गरजेचं आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३५३



**आडवे शब्द –**

२. जन्मजात ७. तोंड, वदन ९. निःश्वास ११. संपूर्ण, विधिवत १२. कार्तिक महिन्याचा पहिला दिवस १४. जुन्या वास्तूची दुरुस्ती व नूतनीकरण १५. भांडण १७. चिखल २०. स्पर्धा, टक्कर २२. आवाज २३. मोठेपणा, महती २४. लहान बालक २६. संख्यादर्शक चिन्ह २७. पोपट, रावा २८. नेहमी २९. गळा ३०. शेजाऱ्यांनी एकमेकांना संकटात मदत करण्याची प्रथा, संकेत ३१. प्रसंग, वेळ ३३. धमाका ३४. मालाला असलेला उठाव ३५. मनन ३६. बारीक अंश ३९. फाजील ४०. अकबराच्या दरबारातील नऊ खास मानकरी ४२. पुरुष ४३. सोंगटी ४४. पराभव पत्करून शरण आलेला ४७. अशुद्ध रक्तवाहिनी ४९. कालिदासाचे प्रसिद्ध नाटक ५०. गुरांचे सावकाश जेवणे ५१. हेळसांड ५२. टिकून राहणे ५४. चांदी ५६. बांबू ५७. नियंत्रण ५८. मृतदेह, प्रेत ६१. टाळता न येणारे ६२. व्यर्थ, फोल ६४. सर्दी ६५. सत्यवानाची बायको ६६. चर ६७. लाकूड कापण्याचे साधन ६९. कपडे शिवताना माप घेण्याचे साधन ७०. न समजणारे ७१. कुबेराचा सेवक ७२. लगेच ७४. वाट चुकणे ७६. अधीन, अंकित ७७. दुर्गा देवी ७९. उपवासाचा एक पदार्थ ८१. भाकरीचे/रोटीचे सोनेरी धान्य ८२. मालदार, पैसेवाला ८४. सूर्य ८७. जपमाळ ८८. क्षमता, आवाका ९०. निकाल, अंत ९१. मोठे भांडे, हंडा ९२. कोल्हापुरी अलंकार ९३. साडीचा पदर ९४. कष्ट ९७. तापाची कणकण ९९. अंगरखा १०१. टवटवी, तजेला १०२. अवलंबन, भिस्त १०३. नरक

**उभे शब्द –**

१. सर्वाधिक महत्त्व, प्राधान्य २. नाहक, विनाकारण ३. अंगीकार, स्वीकार ४. पूजेचे, आरतीचे ताट ५. अनिर्बंध, अव्याहत ६. चार पायांचे जनावर ८. ओशाळलेला ९. सुटका करणे, वर काढणे १०. चिंचगुळाचे रस्सम, मथितार्थ १३. तळलेली मसूर व बारीक शेव यांचा पदार्थ १६. वित्त, धन १८. फुलाची पाकळी १९. वाईट कृत्य २०. धाडस २१. विष्णूचे एक नाव २३. वारुणी, मद्य २५. गणपती २६. तिमिर, तम २९. पार्किन्सन्स आजार ३०. धान्योत्पादनाची जागा ३२. विठ्ठलाच्या कानातील अलंकार ३३. भाकरीचे एक धान्य ३५. विचार करावा असे ३७. अल्प काळ टिकणारे ३८. नृपती ४१. प्रतिष्ठा, पत ४२. कैफ, झिंग ४३. त्वचा, वरचा थर, पोखर ४५. पौराणिक घोडागाडी ४६. ताठा, अहंकार ४८. बाधा, संसर्ग ५०. रात्र ५१. अलगदपणे ५२. काकडीची एक जात ५३. फळातील मगज ५५. खडे सैन्य ५७. फार वापरात नसलेली लांबची वाट ५८. मार्शल आर्टसचा प्रकार ५९. धार्मिक व्रत ५०. सार्वत्रिक सुट्टीचा वार ६१. अंकित किंवा वश न होणारा ६३. आकाशात चंद्र-सूर्य असेतो, कायम ६६. रोडावणे ६७. दालन, हॉल ६८. तलवार ठेवण्याची जागा ७०. विरोध, प्रतिबंध ७१. सफल, यशस्वी ७२. पार, पल्याड ७३. कृपण ७४. सत्तावीसपैकी दुसरे नक्षत्र ७५. अशक्त, कमजोर ७६. जंगल ७८. श्रवणेंद्रिय, कर्ण ७९. जळून खाक ८०. आवश्यकता ८३. परभारे, थेट ८५. चिकार, पुष्कळ ८६. पदार्थ झणझणीत करणारा जिन्नस ८९. त्याप्रमाणे ९३. गझलेतील दोन ओळी ९५. दिवसाचा आठवा भाग, प्रहर ९६. नेहमी ९८. पावसाची झड १००. गाढ मैत्री •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३५२चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. शिमगा ४. परखड ७. उपटसुंभ ११. जळवात १२. घर १३. वगर १५. झब्बा १६. हसतमुख १७. तनसडी १९. हायसे वाटणे २१. वदन २३. मलमल २५. हर २७. गबाळ २८. ताठ २९. खाणे ३०. आपमतलबी ३३. लव ३४. कार ३५. घाणा ३६. भानामती ३७. रुक्ष ३८. अंबा ३९. काल ४०. ताई ४२. पण ४४. जडजवाहीर ४७. विडा ४८. हेरगिरी ५०. भ्रतार ५२. बीळ ५३. रकमाला ५५. ठेवा ५६. काष्टा ५८. वपन ५९. पारोसा ६०. चाप ६३. विजनवास ६५. विरह ६६. हरकलेला ६७. जमा ६८. सभासद ७०. राखणदार ७२. यवस ७३. श्रम ७४. सकल ७५. काचोळी ७७. वन ७८. पिता ८२. पाठीराखा ८४. कमलाकर८७. कमला ८८. अनवाणी ८९. परका ९१. दाव ९२. सिद्धहस्त ९३. गोमेद ९४. दावण ९६. झुरळ ९७. काषाय ९८. वैरण ९९. खंक

**उभे शब्द :** १. प्रांजळ २. शिवालय ३. मत ४. परतणे ५. खवखव ६. डग ८. परिसर ९. सुंभ १०. बिब्बा घालणे १२. घसट १४. रतनबाव १६. हवा १८. बैल १९. हार २०. सेनापती २२. दगलबाज २३. मठ २४. मखाणा २५. हतभागी २६. तंबी २८. तार ३०. आमदार ३१. तरुण ३२. लक्ष ३४. कालवा ३५. घाई ३९. काजळ ४०. तारक ४१. घडा ४२. परी ४३. कांता ४५. डबीर ४६. हीर ४७. विलाप ४८. हेवा ४९. गिर्यारोहण ५०. भ्रष्टाचार ५१. रथ ५४. मावसभाऊ ५५. ठेका ५७. आजमावणे ५९. पारख ६१. पकड ६२. पालापाचोळा ६३. विजय ६४. वास ६५. विराम ६६. हरकत ६९. दहन ७१. दास ७३. श्रमिक ७६. कंठी ७७. वखार ७८. पिलावळ ७९. ताक ८०. समस्त ८१. सनद ८२. पाणीदार ८३. रापण ८५. मदार ८६. रसिक ८७. कहर ८८. अमेय ९०. काटक ९३. गोषा ९५. वण

## नाराज तानाजी सावंतांसोबत एकनाथ शिंदेंची २ तास चर्चा

मुंबई



**भूम - परांडा - वाशी** मतदारसंघाचे शिवसेना आमदार तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आल्यानंतर ते नाराज असल्याची चर्चा सुरू होती. काल रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना तातडीने मुंबईत बोलावून घेतले. या भेटीत दोघांमध्ये तब्बल दोन तास चर्चा झाली असून, सावंत यांनी या भेटीचा फोटो पोस्ट केला आहे.

तानाजी सावंत पोस्टमध्ये म्हणाले की, शिवसेना पक्षाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आज मुंबई येथे तातडीने भेटीचा निरोप आला. या निमित्ताने तत्काळ मुंबईत जाऊन त्यांची भेट घेतली. त्यांच्यासोबत तब्बल दोन तास विविध राजकीय घडामोडींवर आणि राज्याच्या विकासाच्या मुद्यांवर सखोल चर्चा झाली.

शिंदे यांच्या भेटीनंतर आता सावंत यांचे राजकीय पुनर्वसन होणार का, अशी चर्चा होत आहे.

## बुकिंगला प्रतिसाद नसतानाही कोकणची रोरो कार सेवा सुरू

मडगाव

**गणेशोत्सवानिमित्त** कोकणात जाणाऱ्या मुंबईकरांसाठी कोकण रेल्वेने कोलाड ते वेर्णा दरम्यान रोरो अर्थात रोल ऑन रोल ऑफ कार वाहतूक सेवा सुरू केली आहे. या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसतानाही काल शनिवारपासून ही सेवा प्रत्यक्ष सुरू करण्यात आली.

**केवळ ५ गाड्या घेऊन रवाना**

शुभारंभानंतर पहिल्याच दिवशी केवळ पाच वाहने घेऊन ही ट्रेन कोकणाकडे रवाना झाली. या ट्रेनमध्ये १९ प्रवासीही प्रवास करत होते. या गाडीत प्रवाशांना त्यांची वाहने सुरक्षितपणे बसवताना आराम मिळावा यासाठी एक एसी कोच आणि दुसरा सीटिंग कोच देण्यात आला आहे. या पहिल्या गाडीसाठी २१ जुलै रोजी बुकिंग सुरू झाले होते. त्यानंतर १५ ऑगस्ट, २० ऑगस्ट आणि शेवटी २२ ऑगस्ट अशी मुदत वाढविण्यात आली. अंतिम मुदतीपर्यंत केवळ पाच कारचे बुकिंग झाले होते. वास्तविक १६ पेक्षा कमी कारचे बुकिंग झाल्यास ही विशेष रेल्वे रद्द केली जाणार होती. परंतु बुकिंग केलेले प्रवाशी नाराज होऊ नये आणि या सेवेवरील विश्वास वाढावा म्हणून केवळ पाच गाड्या घेऊन ही सेवा कालपासून सुरू करण्यात आली. १९ सप्टेंबरपर्यंत ही रो-रो कार सेवा सुरू राहणार आहे. या प्रवासासाठी कोलाड ते वेर्णा ७८७५ रुपये तर कोलाड येथून नांदगावपर्यंतच्या प्रवासासाठी ५४६० रुपये भाडे आकारले जात आहे.

## भारत - अमेरिका टपाल सेवा स्थगित

नवी दिल्ली

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर पन्नास टक्के आयात शुल्क लावल्याने अमेरिकेच्या सीमा शुल्क नियमांमध्येही बदल होणार असल्याने भारताने अमेरिकेशी असलेली टपाल सेवा स्थगित केली आहे.

३० जुलै रोजी ट्रम्प प्रशासनाने जारी केलेल्या कार्यादेशामुळे ८०० अमेरिकन डॉलरच्या टपालावरील शुल्कमाफी रद्द होणार आहे. त्याचवेळी १०० डॉलरपर्यंतच्या भेटवस्तुंवरील शुल्कमाफी कायम राहणार आहे. या कार्यादेशाची अंमलबजावणी २९ ऑगस्टपासून होणे अपेक्षित आहे. मात्र अमेरिकेच्या या नव्या धोरणामुळे अनेक गोष्टींची स्पष्टता होणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे टपाल खात्याने अमेरिकेसाठीची टपास सेवा तूर्त स्थगित केली आहे.

## इंदापुरात १७ हजार बोगस मतदार निरनिमगावच्या सरपंचांचा दावा

पुणे

**काँग्रेस** नेते राहुल गांधी यांनी देशभरात लाखो बोगस मतदार असल्याचा आरोप केल्यानंतर आता पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातही बोगस मतदार असल्याचा मोठा दावा करण्यात आला आहे. इंदापूर तालुक्यातील निरनिमगावचे सरपंच प्रताप सर्जेराव पाटील यांनी तालुक्यात तब्बल १७ हजार बोगस मतदार असून, फक्त निरनिमगाव या गावातच २०० पेक्षा अधिक बोगस मतदार असल्याचे म्हटले आहे.

प्रताप पाटील म्हणाले की, इंदापूरचे तत्कालीन तहसीलदार श्रीकांत पाटील यांनी ७८ मतदार बोगस असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, त्यांच्या बदलीपूर्वी आदेशावर सही होऊ शकली नाही. त्यानंतर आलेले तहसीलदार जीवन बनसोडे यांनी या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे मतदार यादीत बाहेरगावच्या नागरिकांची नावे नोंदवण्यात आली आहेत. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील वरकुटे व मलवडी येथील २४ जण, इंदापूर तालुक्यातील कळब येथील २८, कालठणचे ६, बोरीचा १, आटपाडीचे ३, कोंडीजचा १, उरुळी देवाचीचे ४, बारामतीतील पिंपळी व लिमटेक येथील ४ नागरिक अशी अनेक नावे मतदारयादीत आढळली आहेत. निरनिमगावात प्रत्यक्षात रहिवासी नसतानाही १०२ जणांची नावे मतदारयादीत आहेत. त्याहून गंभीर बाब म्हणजे अल्पवयीन असलेले तब्बल ४० मुलांनी मतदान केले. या संदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

## अकोल्यात महिलांकडून दारूच्या गुत्त्यांची तोडफोड

अकोला

**गावात** सर्रासपणे सुरू असलेल्या दारू विक्रीमुळे त्रस्त झालेल्या महिलांनी आज मोठा एल्गार पुकारला. अकोला शहरालगतच्या गुडधी गावात अवैध दारू विक्रीविरोधात महिलांनी आक्रमक पवित्रा घेत गुत्त्यांची तोडफोड केली.

गावातील महिलांनी एकत्रित येत दारू विक्री सुरू असलेल्या पत्र्याची शेड आणि हातगाड्यांची मोडतोड केली. इतकेच नव्हे तर, अवैध दारू विक्रेत्यांच्या घरांवरही महिलांनी एकत्र येऊन साठा उध्वस्त केला. गुडधी गावात अवैध दारूविक्री थांबवण्याची मागणी महिलांकडून वारंवार करण्यात आली होती. अनेक तक्रारी करूनही पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले, असा महिलांचा आरोप आहे. यामुळेच महिलांनी स्वतःच कारवाई करण्याचा निर्णय घेतला. महिलांच्या आक्रमकतेमुळे गावात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन आक्रमक महिलांना समजावण्याचा प्रयत्न केला.

## पंजाबमध्ये गॅस टँकरचा स्फोट मृतांचा आकडा ७ वर पोहोचला

अमृतसर

**पंजाबच्या** होशियारपूर येथे दोन दिवसांपूर्वी एका एलपीजी गॅस टँकरच्या स्फोटातील बळींची संख्या आता ७ वर पोहोचली आहे. या दुर्घटनेतील चौघांचा काल उपचारादरम्यान मृत्यू झाला.

पंजाबमधील होशियारपूर ते जालंधर महामार्गावर परवा एका एलपीजी टँकरचा स्फोट झाला होता. त्यावेळी तिघांचा मृत्यू झाला होता तर १७ जण जखमी झाले होते. त्यातील चौघांचा काल मृत्यू झाला. या दुर्घटनेतील १३ जणांवर उपचार सुरू आहेत. मांडियाला येथील हिंदुस्थान पेट्रोलियमच्या बॉटलिंग प्लान्टपासून काही अंतरावर या टँकरची एका टेम्पोबरोबर धडक झाली. त्यानंतर हा टँकर उलटला. त्यातील गॅसची गळती होऊन तो आजूबाजूच्या परिसरात पसरला. त्याला आग लागल्यानंतर महामार्गावरून जात असलेली वाहने व जवळची घरेही या आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. यामुळे घरात झोपलेले काही लोकही होरपळले. जखमींनी तातडीने



रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. पंजाब सरकारने मृतांच्या कुटुंबाला प्रत्येकी २ लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली असून जखमींचा रुग्णालयातील खर्च सरकारद्वारे केला जाणार आहे.

## गणेशोत्सवासाठी पालिकेकडून मुंबईतील सर्व किनारे स्वच्छ

मुंबई

**राज्यात** सुरू होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहरातील सर्व समुद्र किनारे स्वच्छ केले. गेल्या आठवड्यात आलेल्या पावसामुळे या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात आलेला कचरा पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी स्वच्छ केला. १५ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट या काळात अहोरात्र काम करून पालिकेने एकूण ९५२ टन कचरा हटवला. मुंबईतील स्वराज्यभूमी गिरगाव, दादर, माहीम, जुहू, वेसावे, मढ-मार्वे आणि गोराई येथील किनारे पालिकेच्या ३८० कर्मचाऱ्यांनी ६ सयंत्रणांच्या सहाय्याने स्वच्छ केले. महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या सूचनेनुसार महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने ही स्वच्छता मोहीम राबवली. यावेळी गोळा झालेल्या कचऱ्याची रितसर विल्हेवाट लावण्यात आली.

## एसआरए इमारतीतील रहिवाशांना आता पार्किंग उपलब्ध होणार

मुंबई

**शासनाच्या** जुलै २०२५ गृहनिर्माण धोरणअंतर्गत यापुढे मुंबईसह उपनगरात उभ्या राहणाऱ्या एसआरए इमारतीतील रहिवाशांना गाड्या पार्किंगची सोय उपलब्ध होणार आहे. अधिक माहिती देताना एसआरए प्राधिकरणाच्या कार्यालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मुंबईत अनेक भागांत शेकडो एसआरएच्या इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. बहुतांशी इमारती पाच ते सात मजली आहेत. यामध्ये पार्किंगची सोय नाही. आता मुंबई पालिकेच्या नवीन विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार एसआरएच्या पुनर्वसन इमारतीतील रहिवाशांसाठी गाड्या पार्किंगचे बांधकाम करणे अनिवार्य आहे. त्यासाठी बांधकाम



करणाऱ्या खासगी विकासकांना या बदल्यात प्रोत्साहनात्मक विक्री एफएसआय देण्याचे गृहनिर्माण धोरणात प्रस्तावित आहे. गाड्या पार्किंग उपलब्धतेसाठी २२ किंवा २३ मजली उंचीच्या एसआरए योजनेतील इमारती भविष्यात बांधल्या जाणार आहेत. पार्किंगकरिता कमी उंचीच्या इमारतींना स्थान नसेल.

## कबुतरांचा माणसाला धोका नाही! पेटाचे मुख्यमंत्र्यांना पत्र

पान १ वरून

कबुतरांमुळे रोगराई पसरण्याचे खरे प्रमाण किती आहे, हे स्पष्ट करणारे जनजागृती अभियान राबवण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

पेटाने मांडले की, एका जर्मन अभ्यासामध्ये निष्कर्ष निघाला आहे की, पाळीव कबुतरांचा आरोग्यावर फारसा परिणाम होत नाही. एडिनबरो विद्यापीठाच्या अभ्यासानुसार कबुतरांकडून बर्ड फ्लूचा कमी धोका आहे. २०२४ मध्ये मुंबईतील तीन महापालिका रुग्णालयांनी दिलेल्या माहिती अधिकारात दिलेल्या उत्तरानुसार श्वसनविकाराशी संबंधित केवळ ०.३% रुग्णच कबुतरांच्या संपर्कात आले होते.

पेटाने युरोप खंडातील अनेक शहरांमध्ये यशस्वी ठरलेल्या कबुतर संवर्धनाच्या कबुतर नियंत्रण सल्लागार सेवा या मॉडेलचा दाखला दिला. या मॉडेलद्वारे कबुतरांचे अन्न खाण्याचे ठिकाण, घरटी बांधण्याच्या जागा इत्यादींचे नीट व्यवस्थापन करून त्यांना संवेदनशील भागांपासून दूर ठेवता येते. कबुतरांची अंडी बनावट अंड्यांनी बदलून त्यांची संख्या नियंत्रित करता येते. खासगी आणि सार्वजनिक इमारतींमध्ये प्राण्यांना प्रतिबंध करणाऱ्या चमकणाऱ्या फिती लावून कबुतरांना रोखता येऊ शकते. दादर येथील कबुतरखाना बंद करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. पण जैन समाजाने कबुतरखाना सुरूच ठेवण्यासाठी आंदोलन करत महापालिकेच्या कारवाईचा विरोध केला होता. भाजपाचा पाठीराखा असलेल्या जैन समाजाच्या या अतिआग्रही भूमिकेमुळे सत्ताधाऱ्यांची मोठी राजकीय कोंडी झाली आहे. त्यामुळे पेटाच्या या आराखड्यावर मुख्यमंत्री फडणवीस काय भूमिका घेतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## तरुणाने राहुल गांधींचे चुंबन घेत पूर्णियामध्ये सुरक्षा कडे तोडले

पान १ वरून-

रवाना झाली. यावेळी एका धाब्यावर थांबून राहुल यांनी चहापान केले. धाबाचालकाशी गप्पा मारल्या. अररिया येथून राहुल हे आज संध्याकाळी दिल्लीला रवाना होणार आहेत. उद्या यात्रेला एक दिवसाची विश्रांती देण्यात आली आहे. मंगळवारी काँग्रेस खासदार प्रियंका गांधीही यात्रेत सहभागी होणार आहेत. तसेच आगामी काळात इंडिया आघाडीचे देशभरातील दिग्गज नेतेही यात्रेत सहभागी होण्यासाठी येणार आहेत. यात्रेदरम्यान पत्रकार परिषदेत तेजस्वी यादव यांनी केंद्रीय मंत्री चिराग पासवान हे माझे मोठे भाऊ आहेत. त्यांनी लवकर लग्न करावे, असा सल्ला दिला. यावर राहुल गांधी यांनी हे माझ्यासाठीही लागू आहे, अशी मिश्कील प्रतिक्रिया दिली.

## राज ठाकरेंकडून गणपतीचे निमंत्रण

पान १ वरून

मतदारयादीत मतचोरी होते का, मतचोर घुसलेत का हे बघा. घरोघरी जाऊन एका व्यक्तीकडे एकच मत आहे का, ते पाहा. विधानसभेत त्यांनी ३५ ते ४० लाख मतदार वाढवले. जे मतदार घुसवले ते शोधा. नाहीतर पुन्हा बोगस मतदान होईल. काही ठिकाणी दुबार-तिबार मतदान केले जाते.

आगामी निवडणुकीत आपल्या बाजूने मतांचा पाऊस कसा पडेल हे पाहण्याची जबाबदारी प्रत्येक गटप्रमुख व कार्यकर्त्याची आहे. आम्हाला धक्के देणारे अनेक आले आणि गेले. धक्का कदाचित कमी बसला असेल, पण धोका झालेला आहे. यानंतरही आम्हाला धोका देण्याचा प्रयत्न होईल, पण जोपर्यंत तुमची तटबंदी आहे, तोपर्यंत धोके देणाऱ्यांची डोकी फुटतील, बाकी काही होणार नाही. आता विघ्नहर्त्याचे आगमन होणार आहे. त्याला साक्षी ठेवून सांगतो, आम्ही हिंदुत्वाचा भगवा झेंडा घेऊन निघालो आहोत. वाटेत स्वतःला वाघ म्हणवणाऱ्या काळ्या मांजरी आडव्या येतात. त्या काळ्या, अपशकुनी मांजरांचा बंदोबस्त तूच कर नाहीतर आम्ही आहोतच.

## आरक्षणासाठी ही अंतिम लढाई मुंबईत येण्यावर मनोज जरांगे ठाम

पान १ वरून

कुठेही डीजे वाजवू देणार नाही. तुमच्या एका चुकीमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना डाग लागू शकतो आणि तुमचे करिअर उद्ध्वस्त होईल. पुढे ते म्हणाले की, महायुती सरकारमध्ये एक तात्या आणि दोन आप्पा बसले आहेत. फडणवीस यांनी जातींमध्ये भांडणं लावली आहेत. आरक्षणासाठी ही माझी शेवटची लढाई आहे. मुंबईला येण्याची हौस नाही, पण मुंबई ही न्यायाची भूमी आहे. आम्ही तिकडे न्यायासाठी येत आहोत, कोणाला त्रास द्यायला येत नाही. आंदोलनात जाळपोळ किंवा दगडफेक करण्यासाठी विरोधकांची लोक येतील. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करावे आणि जो दगडफेक करेल त्याला पोलिसांच्या ताब्यात द्या. शांततेने मुंबईच्या दिशेला मोर्चा घेऊन जायचा.






# नवा काळ

• पुणे | सोमवार २५ ऑगस्ट, २०२५ • पान -८


## भारतात पाकिस्तानी विमानांच्या हवाईबंदीला पुन्हा मुदतवाढ




**नवी दिल्ली-** भारताने पाकिस्तानी विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद ठेवण्याचा कालावधी पुन्हा २४ सप्टेंबरपर्यंत वाढवला आहे.दुसरीकडे, पाकिस्ताननेही भारतीय विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद ठेवण्याचा कालावधी २४ सप्टेंबरपर्यंत वाढवला आहे. दोन्ही देशांनी हवाई क्षेत्र बंद करण्याच्या मुदतवाढीसाठी एअरमेनला स्वतंत्र नोटिस जारी केल्या आहेत. पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये २६ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने ३० एप्रिलपासून पाकिस्तानी विमान कंपन्या आणि ऑपरेटर्सद्वारे चालवल्या जाणाऱ्या, मालकीच्या किंवा भाडेतत्त्वावर घेतलेल्या विमानांसाठी, ज्यात लष्करी उड्डाणे समाविष्ट आहेत, आपले हवाई क्षेत्र बंद केले होते. ही बंदी २४ मे पर्यंत होती.त्यानंतर दर महिन्याला तिचा कालावधी वाढवला गेला.शेवटची बंदी २४ ऑगस्टपर्यंत होती. ही बंदी आता २४ सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.




महालक्ष्मीचा महाराजा



तुळशीवाडीचा महाराजा



सोनपुरीचा राजेश्व, कुलाबा



खेतवाडीचा सुखकर्ता, ३ री क्रॉस लेन, ३६ फुटी मूर्ती

## गेमिंगवरील बंदीनंतर ड्रीम ईलेव्हनचे नवे ॲप

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारने ऑनलाईन मनी गेमिंग ॲपवर बंदी घातल्यानंतर आता ड्रिम इलेव्हन या ऑनलाईन गेमिंगमधील कंपनीने आर्थिक गुंतवणूक करता येईल असे प्रकारचे नवीन ॲप तयार केले आहे. या ॲप द्वारे मुदत ठेवी व सोन्यामध्ये गुंतवणूक करता येणार आहे.

ड्रीम ११ ही कंपनी भारतीय क्रिकेट संघाचा प्रायोजक आहे. हे ॲप सध्या बीटा टेस्टिंग मध्ये असून ते गुगल प्लेस्टोअर व एपल स्टोअरवर उपलब्ध आहे. ऑनलाईन गेमिंग २०२५ च्या कायद्यानंतर पैशांचे व्यवहार असलेल्या ऑनलाईन खेळांवर पूर्णपणे बंदी टाकण्यात आली आहे. त्यामुळे कदाचित या कंपनीला भारतीय क्रिकेट संघाचे प्रायोजकत्वही सोडावे लागणार असल्याची शक्यता आहे. या कंपनीने तयार केलेल्या नव्या प द्वारे डिजीटल सोन्यात गुंतवणूक, फिक्स्ड डिपॉझिट, दैनंदिन खर्चाचा मागोवा घेणे, शेअर, म्युच्युअल फंड, कृत्रिम बुद्धीमत्तेच्या सहाय्याने गुंतवणूक सल्ला, विमा संरक्षण आदी क्षेत्रात काम केले जाणार आहे. मनी गेमिंगवर बंदी आणून ७२ तास उलटत नाहीत तोवर हे नवे प आल्याने बंदीचा कधी निर्णय येणार याची त्यांना पूर्वकल्पना होती का याची चर्चा सुरू आहे.

## विनाअनुदानित शिक्षकांचा ५ सप्टेंबरला काळा शिक्षक दिन

■ कोल्हापूर

**गेल्या** महिन्यात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील टप्पा वाढीच्या निर्णयाचा शासन आदेश येत्या ३० ऑगस्टपर्यंत काढावा. अन्यथा ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन संचालक, उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळा शिक्षक दिन म्हणून साजरा करुन शंखनाद आंदोलन केले जाईल, असा इशारा विनाअनुदानित कृती समितीचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सरकारला निवेदनाद्वारे दिला आहे.

खंडेराव जगदाळे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने गेल्यावर्षी १४ ऑक्टोबर रोजी टप्पा वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली नाही. त्यानंतर यंदा १७ जुलै रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्या निर्णयातील त्रुटी व शर्ती नुसार ९७० कोटी रुपये मंजूर केले. परंतु दीड महिना झाला तरी अजून शासन आदेश निघालेला नाही. त्यामुळे राज्यभरातून शासनाच्या विरोधात असंतोष पसरला आहे.

## भाजपा अर्धवट ज्ञानी! गुडघ्यातसुद्धा मेंदू नाही

■ मुंबई

**पाकिस्तानविरोधात** क्रिकेट खेळण्याबाबत सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू जावेद मियाँदाद मातोश्रीवर आल्याची आठवण करून उबाठाचे डोके चोरीला गेले आहे, असा टोला लगावला होता. यावरून उबाठा खासदार संजय राऊत यांनी त्यांना प्रत्युत्तर देते म्हटले की, भाजपाच्या गुडघ्यातसुद्धा मेंदू नाही. सगळा भाजपा अर्धवटज्ञानी आहे.

संजय राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे अर्धज्ञानी आहेत आणि मुळात संपूर्ण भाजपाच अर्धवट ज्ञानी आहे. भाजपाच्या गुडघ्यातसुद्धा मेंदू नाही. त्यांनी मी बनवलेला ठाकरे चित्रपट

**खा. राऊतांचा घणाघात**

त्यांनी पाहावा. त्या काळातील बाळासाहेबांच्या मुलाखती वाचाव्यात. एकवचनी या पुस्तकात बाळासाहेबांनी आपली भूमिका स्पष्ट मांडली आहे. दिलीप वेंगसरकर जावेद मियांदादला घेऊन मातोश्रीवर आले होते आणि भारत-पाकिस्तान क्रिकेट पुन्हा सुरू करण्याची विनंती केली होती. मात्र बाळासाहेबांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, दहशतवाद आणि क्रिकेट एकत्र चालणार नाही. काश्मीरमध्ये पाकिस्तानचा रक्तपात थांबत नाही, तोपर्यंत पाकसोबत क्रिकेट खेळण्याला परवानगी नाही. फडणवीस, तुमच्या नरेंद्र मोदींसारखे बाळासाहेबांनी पाकिस्तान, चीन किंवा ट्रम्पसमोर शेपूट घातले नाही. ऑपरेशन सिंधूरच्या वेळी मोदी म्हणाले होते की रक्त आणि पाणी एकत्र चालणार नाही. मग आता क्रिकेट कसे चालते?

## साईबाबांचा लाडू प्रसाद ५० टक्क्यांनी महागला

■ शिर्डी

**शिर्डीच्या** साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी विक्रीस उपलब्ध असलेल्या बुंदी लाडू प्रसादाच्या दरात तब्बल ५० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. पूर्वी दोन लाडूंचे पाकीट २० रुपयांना मिळत होते, मात्र आता त्यासाठी भाविकांना ३० रुपये मोजावे लागणार आहेत. शिर्डीत येणार्या लाखो भाविकांना संस्थानकडून मोफत लाडवाचा प्रसाद दिला जातोच; पण विक्रीसाठी उपलब्ध असलेला प्रसादही भाविक मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात. मात्र आता दरवाढ झाल्याने भक्तांना अतिरिक्त खर्च करावा लागणार आहे. साई संस्थानच्या या निर्णयामुळे भक्तांमध्ये नाराजी आहे.

## समाजाकडूनच माझ्यावर टीका सरन्यायाधीश भूषण गवईंची खंत



■ पणजी

**सरन्यायाधीश** भूषण गवई यांनी अनुसुचित जाती प्रवर्गाच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा निकाल दिल्यावरून माझ्या समाजातूनही माझ्यावर निशाणा साधण्यात आल्याची खंत बोलून दाखवली. गोवा हायकोर्ट बार असोसिएशनने पणजी येथे सरन्यायाधीशांचा समारंभ आयोजित केला होता.

या कार्यक्रमात गवई यांचा समावेश असलेल्या पीठाने दिलेल्या आरक्षण उपवर्गीकरण निकालाचा वक्त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. हाच धागा पकडत सरन्यायाधीश गवई म्हणाले, या निकालावरून माझ्याच समाजाने माझ्यावर मोठ्या प्रमाणात टीका केली. पण लोकांची मागणी किंवा इच्छेनुसार मी निकालपत्र लिहित नाही. कायदा आणि स्वतःच्या अंतरात्म्याला अनुसरून मी निकाल देतो.

सात न्यायमूर्तींचा समावेश असलेल्या घटनापीठासमोर अनुसुचित जाती प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणात उपवर्गीकरणसंदर्भात सुनावणी झाली. यानंतर गेल्यावर्षी ऑगस्टमध्ये घटनापीठाने सहा विरुद्ध एक असा बहुमताने निकाल दिला. त्यानुसार, अनुसूचित जाती हा प्रवर्ग सामाजिकदृष्ट्या एकसंध वर्ग नाही. त्यामुळे राज्य सरकारांना त्यांचे उपवर्गीकरण करून सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी आरक्षण देण्याची मुभा आहे. यासाठी क्रिमिलेयरचा आधार घेण्यास सांगितले होते.

## बीडमध्ये मारहाण सत्र सुरूच तरुणाला हॉटेलबाहेर मारहाण

■ बीड

**बीडमध्ये** मारहाणीचे सत्र सुरूच आहे. मांजरसुंबा-अंबाजोगाई राज्य महामार्गावरील एका हॉटेलबाहेर किरकोळ वादातून एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली. या घटनेचा व्हिडीओही व्हायरल होत आहे.

तरुण मांजरसुंबा-अंबाजोगाई राज्य महामार्गावर असलेल्या एका हॉटेलमध्ये गेला असता त्याचा वेटरसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद वाढताच वेटर व हॉटेल मालकाने मिळून तरुणावर तरुणाला बेदम मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी धारदार शस्त्र आणि लाकडी वस्तूंनी हल्ला केला. या हल्ल्यात तरुणाच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर गंभीर जखमा झाल्या. रक्तबंबाळ अवस्थेत त्याला तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.



दक्षिण मुंबईत केवळ एका वॉर्डमध्ये गाय घेऊन बसण्यास परवानगी नाकारली जात आहे. याबाबत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे तक्रार करून त्यांना मदतीची विनवणी करण्यास कल्पना गवळी यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी राज ठाकरे यांना निवेदन दिले.

## राजस्थानच्या कोटा आणि बूंदीमध्ये पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वायुदल तैनात

■ जयपूर

**राजस्थानच्या** अनेक भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे विविध जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. कोटा व बूंदी जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी वायुदलाने एमआय १७ जातीचे हेलिकॉप्टर तैनात ठेवण्यात आले आहे. येथील अनेक भागात एनडीआरएफ व राज्य आपत्तीनिवारण दलाचे जवान मदतकार्य करत आहेत. राजस्थानातील अनेक सखल भागात पाणी साचल्याने रस्ते व रेल्वे वाहतूकही बाधीत झाली आहे.

राजस्थानमध्ये गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू असून पुढील दोन दिवस ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. राजस्थानच्या सवाई माधोपूर, टोंक, कोटा, बूंदी, झालावाड, भीलवाडा, चित्तौडगड, डूंगरपूर व बांसवाडा जिल्ह्यातील शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. कोटा जिल्ह्यात कैथून धरनावदा राज्य महामार्ग बंद झाला आहे. येथील प्रताप चौक, इंद्रा मार्केट व सदर बाजार हे अडकलेल्यांसाठी अन्नाची पाकिटे टाकली जात आहेत. माधोपूर जिल्ह्यातील डूंगर भागात निगोह नदीला महापूर आला आहे.

## २९ ऑगस्टपर्यंत भूसंपादनासाठी मान्यता द्या अलिबागमधील शेतकऱ्यांना शेवटची मुदत

■ अलिबाग

**अलिबाग** तालुक्यातील शहापूर थेरंड येथील भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना २९ ऑगस्टपर्यंत संमतीपत्र देण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी या नोटीसा बजावल्या आहेत.

अलिबाग तालुक्यातील शहापूर धेरंड औद्योगिक वसाहतीत सिनारमन्स कंपनीचा अशिया खंडातील सर्वात मोठा प्रकल्प येणार आहे. या औद्योगिक वसाहतीच्या रस्त्यासाठी भूसंपादन सुरु आहे. औद्योगिक वसाहतीसाठी आधी टाटा कंपनीच्या औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पासाठी जमीन संपादीत केली होती. तीच जमीन सिनारमन्स कंपनीला देण्यासाठी राज्य सरकार बरोबर सामंजस्य करारही झाला आहे. या औद्योगिक वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी आणखी ८.५५ हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. उच्चाधिकार समितीने या जमिनीसाठी ९६ लाख ६९ हजार ५५४ रुपये प्रतिएकर दर लावला आहे. यासाठी संमती करार करण्यासाठी शेतकऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्या असून त्यांना २९ ऑगस्टपर्यंत उपविभागीय कार्यालयात करारपत्र सादर करायला सांगण्यात आले आहे.

## गगनयान मोहिमेसाठी इस्त्रोची पहिली एअर ड्रॉप चाचणी यशस्वी

■ नवी दिल्ली

**भारताच्या** गगनयान मानव अंतराळ मोहिमेच्या तयारीतील महत्त्वाचा टप्पा गाठून इस्त्रोने आज पहिली एकत्रित एअर ड्रॉप चाचणी (आयएडीटी - ०१) यशस्वीपणे पूर्ण केली आहे. ही चाचणी इस्त्रो, भारतीय हवाई दल, संरक्षण संशोधन व विकास संस्था (डीआरडीओ), भारतीय नौदल आणि तटरक्षक दल यांच्या संयुक्त सहकार्याने पार पडली.

याबाबत इस्त्रोने एक्स पोस्ट केली की,गगनयान मोहिमेसाठी पॅराशूट आधारित वेग-निर्मूलन प्रणालीच्या अखंड कार्यक्षमतेसाठी आयएडीटी - ०१ चाचणी यशस्वी झाली आहे.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी सांगितले की, ह्युमन रेटेड लॉन्च व्हेईकलचा विकास व जमिनीवरील चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. ऑर्बिटल मॉड्यूलसाठी आवश्यक प्रणोदन प्रणाली, ईसीएलएसएस, क्रू एस्केप सिस्टीमसाठी पाच मोटर, नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र यांची उभारणी झाली आहे.

## रीम्स जमिनीच्या आंदोलनाआधी माजी मुख्यमंत्री चंपई सोरेन यांना नजरकैद

■ रांची

**झारखंडचे** माजी मुख्यमंत्री व भाजपा नेते चंपई सोरेन यांना प्रस्तावित राजेंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (रीम्स - २) साठी कांके परिसरातील जमिनीच्या अधिग्रहणाविरोधात होणाऱ्या आंदोलनाआधी नजरकैद केले.

याबाबत चंपई सोरेन यांनी एक्सवर लिहिले की,नागडी येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या आवाजाला दाबण्यासाठी झारखंड सरकारने मला नजरकैदेत ठेवले आहे. पोलीस उपायुक्त के. व्ही. रामन यांनी सांगितले की,कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असल्याने हा निर्णय घेतला आहे. याप्रकरणात पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे सोरेन सध्या घरीच राहतील. त्यांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. यावर भाजपाने झारखंड सरकारवर जोरदार टीका करून या कारवाईला तानाशाही आणि दडपशाहीचे चिन्ह असल्याचा आरोप केला. केंद्रीय मंत्री संजय सेठ यांनी एक्सवर लिहिले की,आदिवासी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आवाज उठवणाऱ्या सोरेन यांना नजरकैदेत ठेवणे लोकशाहीसाठी काळा ठप्पा आहे.

झारखंड सरकारने रांचीच्या कांके परिसरात रीम्स २ वैद्यकीय संस्था उभारण्यासाठी सुपीक शेती जमीन अधिग्रहित करण्याचा निर्णय घेतला.

## बंदीच्या आधीच गेमिंग कंपनीचे शेअर्स विकले

■ नवी दिल्ली

**७७० कोटींचा फायदा**

**केंद्र** सरकारने ऑनलाईन मनी गेमिंग कंपन्यांवर बंदी घातली असली तरी सुप्रसिद्ध गुंतवणूकदार रेखा झुनझुनवाला यांनी नजारा टेक्नोलॉजिज या कंपनीतील शेअर बंदीच्या आधीच विकल्याने त्यांचा ७७० कोटी रुपयांचा फायदा झाला आहे.

प्रसिद्ध गुंतवणूदार दिवगंत राकेश झुनझुनवाला यांच्या पत्नीचे नजारा टेक्नोलॉजिज या कंपनीमधील आपला वाटा जून महिन्यातच विकण्याचा निर्णय घेतला होता. २ जून ते ६ जून या काळात त्यांनी या कंपनीतील आपला काही वाटा विकला, त्यानतर ९ व १० जून रोजी शिल्लक हिस्साही विकून टाकला. या व्यवहारामधून त्यांना चौपट म्हणजेच तब्बल ७७० कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. या ऑनलाइन गेमिंगवर बंदी येणार आहे.